॥ श्रीदेव अंजनेश्वर प्रसन्न ॥

बारा गावांचे स्वयंभू जागृत देवस्थान

# श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे

मु. पो. मिठगवाणे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी - ४१६७०२

(ट्रस्ट रजि. नं. ए-६७ नोंदणी वर्ष- सन १९५२)

# वार्षिक अहवाल

(वर्ष सन २०१९-२०)





पालखीत विराजमान असलेले श्रीदेव भवानीशंकर अंजनेश्वर...



त्रिपुरारी पौर्णिमेच्या दिवशीचा दुपारचा महाप्रसाद कार्यक्रम..



त्रिपुरारी पौर्णिमेला त्रिपुर पूजनापूर्वीची मंदिर प्रदक्षिणा..



महाशिवरात्री उत्सवामधील ह.भ.प.सौ.वेदश्री ओक, डोंबिवली कीर्तनसेवा सादर करताना..




कार्तिकोत्सवातील मंदिर रोषणाई..



वार्षिक होळीचा कार्यक्रम...
होळी गावातील खेळगड्यांचे 'होळी खेळवणे'

॥ श्रीदेव अंजनेश्वर प्रसन्न ॥



बारा गावांचे जागृत देवस्थान



# श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे

(ट्रस्ट रजिस्ट्रेशन नं. ए-६७ नोंदणी वर्ष- सन १९५२)

## -निमंत्रण -

स.न.वि.वि.

प्रतिवर्षाप्रमाणे श्रीदेव अंजनेश्वरचा वार्षिक कार्तिकोत्सव मिती कार्तिक शुद्ध एकादशी ते कार्तिक पौर्णिमा **बुधवार दिनांक २५ नोव्हेंबर २०२० ते रविवार दिनांक २९ नोव्हेंबर २०२०** असा पाच दिवसांचा आहे. उत्सव काळातील पाच दिवसामध्ये आरती, भोवती, कीर्तन हे प्रथेप्रमाणे कार्यक्रम होणार आहेत. तरी आपण सर्वांनी अगत्यपूर्वक उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी व यथाशक्ती देणगी पाठवावी, ही विनंती.

आपले नम्र,

**विश्वस्त,**
**श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे**

संपर्कासाठी मोबा नं. 9823277326 (WhatsApp)***
7038785001 / 9284388731
ई-मेल आयडी- shridevanjaneshwar@gmail.com

## -कार्तिकोत्सवातील कार्यक्रम-

कोरोना रोगाच्या सावटामुळे उत्सवाच्या कार्यक्रमाची रूपरेषा येथे दिलेली नाही. उत्सवामधील कार्यक्रम नेहमीप्रमाणेच करण्याचा प्रयत्न राहील. तरी कार्यक्रमाबाबत फेसबुक व व्हॉट्सअॅप व स्थानिक वर्तमानपत्राच्या माध्यमातून प्रसिद्धी केली जाईल व सर्व भाविक भक्तांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाईल. आपणही आमच्या संपर्कात रहावे.. तुलसीविवाह, बलिपूजन, त्रिपुर पूजन, रोजची आरती, भोवती, कीर्तन हे प्रतिवर्षाप्रमाणेच होईल. स्वरूप कमी-जास्त होईल, इतकेच.

## -महत्त्वाच्या सूचना-

● देणगीदारांना आपली देणगी श्रीदेवाच्या बँक खात्यात थेटपणे जमा करता येईल.

-बँक खात्याचा तपशील -

**' श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे '**

**A/c No. - 143710100000001**

**IFSC code - BKID0001437**

**बँक ऑफ इंडिया, मिठगवाणे शाखा**

भीमॲप, पेटीएम आदी मोबाईल ॲपद्वारा वरील तपशील घालून देणगी रक्कम पाठवता येईल. तसेच कोणत्याही बँकेतून एनईएफटी/आरटीजीएस करता येईल. देणगी श्रीदेवाच्या बँक खात्यात जमा केल्यावर पेमेंट-स्क्रीनशॉट व आपला पूर्ण पत्ता (पिनकोड व मोबाईल नंबर सह) WhatsApp No. 9823277326 वर मेसेज करून किंवा shridevanjaneshwar@gmail.com या मेलवर पाठवता येईल. भाविक भक्तांनी आपली देणगी थेट श्रीदेवाच्या बँक खात्यात पाठवण्यास प्राधान्य द्यावे... आपला पूर्ण पत्ता आम्हाला मेसेज करून पाठवल्यावर देणगी पावती बनवून आपल्याला पोस्टाद्वारे पाठविणे, प्रसाद/अंगारा पाठविणे आम्हाला सोयीचे होईल. कृपया बँकेत जमा केलेल्या देणगीचा तपशील न विसरता पाठवावा.

● मनीऑर्डर द्वारा देणगी रक्कम पाठवताना मनीऑर्डर फॉर्मवर संपूर्ण पत्ता पिनकोड सह लिहावा. मनीऑर्डर रिसीटचा फोटो WhatsApp No. 9823277326 वर मेसेज करून अथवा ई मेल वर पाठवता येईल. मनीऑर्डर द्वारा देणगी रक्कम पाठवताना कमिशन लागते व मनीऑर्डर आमचे पर्यंत पोहोचायला विलंब होतो. तसेच अशी पाठवलेली रक्कम आमचेकडे काही दिवसांसाठी तरी हाती जमा रहातेच. आपण देणगीची रक्कम थेट बँक खात्याला भरणा केली की कमिशन लागत नाही, रक्कम हाती जमा रहात नाही. तरी आमची विनंती आहे की आपण शक्यतोवर आपली देणगी थेट श्रीदेवाच्या बँक खात्याला जमा करण्यासाठी प्राधान्य द्यावे.

● चेक द्वारा देणगी पाठविणाऱ्या देणगीदारांनी आपला पूर्ण पत्ता द्यावा. तथापि चेक द्वारे देणगी दिल्यानंतर पोस्टेज, वटाव कमिशन, चेक क्लिअरिंग, चेक बाउंस होणे आदी समस्या येतात. त्यामुळे देणगीदारांना आमची विनंती आहे की सदरचा चेक आपणच श्रीदेवाच्या खात्याला ट्रान्स्फर केला तर ते अधिक सुलभ होईल. आपण शक्यतोवर आपल्या देणगीचा चेक थेट श्रीदेवाच्या बँक खात्याला जमा करण्याला प्राधान्य द्यावे.

● देणगीदारांना कोणत्याही बँकेत स्वत:च्या नावाने मुदत ठेव ठेवून त्याचे तिमाही अथवा वार्षिक व्याज श्रीदेवाच्या बँक खात्याला ट्रान्स्फर करता येईल. आपल्या व्याजाची रक्कम वर्षभर होणाऱ्या सर्व धार्मिकांसाठी व देवस्थान सुधारणेसाठी खर्च होईल. अशी मुदत ठेव किमान रु.१० हजार किंवा समान पटीत असावी, अशी विनंती आहे. या देणगीदारांची नावे कायम देणगीदार या सदराखाली येतील. व्याज जमा झाल्यावर देणगी पावती/प्रसाद पाठवणे ही देवस्थानची जबाबदारी राहील.

● श्रीदेवाला 'वस्तुरूप देणगी' देताना देवस्थानशी संपर्क साधून दिल्यास योग्य होईल. मंदिरातील गरजा लक्षात घेऊन वस्तुरूप देणगी दिली जावी, अशी नम्र सूचना आहे.

● देवस्थान संबंधातील अनेक तऱ्हेची माहिती/फोटो/व्हिडीओ व सर्व काही 'Shri Dev Anjaneshvar Devasthan' या फेसबुक पेजवर अपलोड करण्यात आली आहे. तरी आपणही या फेसबुक पेजला आवर्जून भेट द्यावी. तसेच श्रीदेवाच्या फेसबुकला सन २००७ पासूनचे अहवाल अपलोड केलेले आहेत. सन २००७ वर्षापासूनचे संपूर्ण ऑडिट रिपोर्ट अपलोड केलेले आहेत. तसेच देवस्थान ट्रस्टच्या नोंदणीचे दस्त ऐवज, पी.टी.आर. उतारा, विश्वातांनी दिलेली राजीनामा पत्रे आदी दस्त सुद्धा पीडीएफ फाईल करून अपलोड केलेले आहेत. तसेच देवस्थान जमिनींबाबत शासकीय कार्यालयात झालेले आदेश सुद्धा अपलोड केलेले आहेत.. जेणेकरून फेसबुकच्या माध्यमातून देवस्थान बाबतीतील सर्व माहिती देणगीदार, भाविक भक्तांपर्यंत पोचती होईल. त्यामध्ये काही चुकीचे असेल तर कुणाही देणगीदाराला, भाविकाला अथवा देवस्थान हितसंबंधी माणसाला संपर्क साधता येईल.

● देवस्थान भक्तनिवासामध्ये निवास व भोजन, नाश्ता, चहापानाची सोय होण्यासाठी श्री. सदानंद तुकाराम तथा राजा लिंगायत यांचेशी मोबा.नं. 7262919514 या द्वारे आगाऊ संपर्क साधावा. निवासव्यवस्थेच्या नोंदणीसाठी आपले आधारकार्ड अनिवार्य आहे.

● श्रीदेवावर आवर्तन, अभिषेक, एकादशणी आदी धार्मिक विधींसाठी श्री.विजय भुस्कुटे मोबा.नं.9820675085 (व्हॉट्स ॲप) अथवा श्री. शेखर फडके मोबा.नं. 9326621404(व्हॉट्स ॲप)/8552976232 यांचेशी आगाऊ संपर्क साधावा.

# दोन शब्द अहवालाबाबत .....

**देणगीदार, भाविक भक्तमंडळी यांसी**

**सप्रेम नमस्कार विनंती विशेष...**

विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर सन २०१९-२० चा वार्षिक अहवाल श्रीदेवाच्या पुढ्यात वाचण्यासाठी ठेवून त्यानंतर आपणा सर्वांना पोस्टाद्वारे, फेसबुकद्वारे, इमेलद्वारे व व्हॉट्सॲप द्वारे पोहोचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी केला आहे... श्रीदेव अंजनेश्वर देवस्थान ट्रस्टचा 'वार्षिक अहवाल' आपल्याकडे अवलोकनासाठी सविनय सादर केला आहे... देणगीदारांना वार्षिक जमाखर्च कळावा, देवस्थान मधील वार्षिक उत्सवांची माहिती समजावी, वर्षभरातील कामकाज कळावे, मंदिरातील बारिकसारीक सुधारणा कळाव्यात, पाठविलेल्या देणगीचा योग्य विनियोग होतो की नाही हे सामान्यपणे, ढोबळपणे कळावे हा त्यामागील हेतू आहे. 'जे जे आपणासि ठावे । ते ते इतरांसी सांगावे । शहाणे करुन सोडावे । सकळ जन' या समर्थ वचनाला आदर्श समजून 'अभ्यासोनि प्रगटण्याचा' हा माझा प्रयत्न आहे.. सीए श्री.निलेश नंदकुमार पाटणकर, राजापूर यांनी ट्रस्टचे ऑडीट करून दि.३१ जुलै २०२० रोजी धर्मादाय विभागाच्या वेबसाईटला सदरचा ऑडीट रिपोर्ट अपलोड केलेला आहे. तसेच देवस्थान मार्फतही दि. १०.०८.२०२० रोजी धर्मादाय पोर्टल वरील अपलोड पोचपावती जोडून पुनश्च ऑडीट रिपोर्ट मे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त रत्नागिरी यांच्याकडे पाठवला आहे. ट्रस्टचा ऑडीट रिपोर्ट धर्मादाय दप्तरी दाखल होऊन मंजूर झालेला आहे. संपूर्ण ऑडिट रिपोर्ट या अहवालाच्या पीडीएफ प्रतीसोबत फेसबुक व व्हॉट्सॲपला एकत्रितपणे पाठवणार आहे... ट्रस्टच्या एकूण कामकाजाचे प्रतिवर्षी 'सोशल ऑडीट' व्हावे या हेतूने हा वार्षिक अहवाल आपल्याला सादर केला आहे. जेणेकरून कारभारातील त्रुटी, दोष आपल्याकडून समजून त्यामध्ये जरूर त्या सुधारणा करणे आम्हाला सोयीचे होईल. अहवाल छपाईमध्ये काही लेखन दोष, अभावित चुका असू शकतील. कृपया आपल्या लक्षात आल्यास त्या दुरुस्त करता येतील. आर्थिक व्यवहारासह अन्य दैनंदिन व्यवहार, नवीन सुधारणा, देवस्थान जमीन विषयक घडामोडी, जनरल व्यवस्थापन आदी अनेक बाबींचा उहापोह या अहवालाच्या माध्यमातून करण्याचा मी प्रयत्न केला आहे. त्या सर्वांचे 'सोशल ऑडीट' या वार्षिक अहवालाच्या रूपाने झाले की ते योग्य होईल व ट्रस्टच्या भविष्यातील वाटचालीला उपयोगाचे होईल. आपण अहवालाचे वाचन करून त्याबाबतचा लेखी अभिप्राय कळवावा, अशी अपेक्षा आहे. नकळत चुकांबद्दल क्षमा असावी...

श्रीदेवाच्या मंदिरावर रविवार दि. २४ फेब्रुवारी २०१९ रोजी सोन्याचा कळस बसवल्यानंतर मंदिराचा स्टेटस बदलला आहे. विशेषत: शासन दरबारी अंजनेश्वर मंदिराला विशेष महत्त्व आले आहे. सोन्याच्या किंमती भरमसाठ वाढल्यामुळे सुवर्णकलश योजना फायदेशीर ठरली आहे. जवळपास ४५/४६ लाखांचा फायदा झाला, असेच म्हणावे लागेल. भांडवली उत्पन्नात सोन्याची वाढीव किंमत ही एक प्रकारची 'मालमत्तेतील भर' पडलेली आहे. त्यामुळे सुवर्ण कलशाच्या देणगीदारांची देणगी देवस्थानसाठी 'दिडपट मोलाची' झाली आहे.. यामुळे या अहवालाच्या निमित्ताने सुवर्ण कलशाच्या देणगीदारांना पुन्हा एकदा धन्यवाद देत आहे...

या अहवाल वर्षात श्रीदेवाच्या जमिनीबाबत महत्त्वाचे कामकाज झाले आहे. देवस्थान जमिनीबाबतची शोधमोहीम राजापूर तालुक्यासाठी राबवत असताना राजापूरचे प्रांताधिकारी मे. प्रवीण खाडे साहेब यांनी श्रीदेवाच्या जमीन उताऱ्यांमधील झालेले 'लेखन दोष' दुरुस्त करून घेण्याची कारवाई तहसीलदार कार्यालयामार्फत पूर्ण करून घेतली आहे... तसेच अनाधिकारे, वारस संबंध नसताना लागलेली अनेकांची नावे कमी करून पूर्वस्थिती आणली आहे... सन २०१० मधील देवस्थान इनाम जमिनीबाबतचा शासन निर्णय

व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या आधारे संबंधितांच्या सुनावण्या घेऊन चुकीच्या नोंदी हटवल्या आहेत. सुमारे ३५९ सर्व्हेनंबरच्या जमीन क्षेत्रामध्ये लेखन दुरुस्ती करून 'श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे' अशी नोंद सातबारा मधील कब्जेदार रकान्यात आणली आहे... जवळपास ६९ जमीन खात्यात ही दुरुस्ती झालेली आहे... यामुळे श्रीदेवाचे जमीन खाते गावातील सर्वात मोठे जमीन खाते झाले आहे. या कामी प्रान्ताधिकारी श्री. प्रविण खाडेसाहेब, राजापूरच्या तहसीलदार श्रीम. प्रतिभा वराळे, जैतापूरचे मंडल अधिकारी श्री. जाधवसाहेब, माजी तलाठी श्री. दत्तात्रय बंडू शेवाळे व विद्यमान तलाठी श्री. युवराज कुंडलिक पवार यांनी विशेष मेहनत घेऊन ह्या जमिनीतील लेखन दोष दुरुस्त्या केल्या आहेत. त्यामुळे या सर्व अधिकारी कर्मचारी वर्गाचा नामोल्लेख करून आभार व्यक्त करणे, हे आमचे कर्तव्यच आहे. या अहवाल वर्षातील जमीन सुधारणेचे काम लक्ष्यवेधी आहे व हे झालेले काम श्रीदेवाच्या समग्र इतिहासात 'सुवर्णाक्षराने' लिहिण्यासारखे आहे.

अहवालात वर्षभरात झालेल्या सोयीसुधारणा आपल्यापुढे मांडल्या आहेत. जनरल मिटिंग, कार्तिकोत्सव, महाशिवरात्रीउत्सव, श्रीदेवी मुहूर्ताईचा नवरात्री उत्सव, शिमगोत्सव आदी वर्षभरातील उत्सव साजरे होत असताना सेवेकरी, मानकरी, खोत, ग्रामस्थ, देणगीदार, ग्रामपंचायत प्रशासन, विद्युत मंडळ आदींचे योगदान मोलाचे आहे. या सर्व उत्सवांमधील वाढती उपस्थिती, लहान मुलांचा सहभाग, महिलांमधील उत्साह वाखाणण्यासारखा आहे. अहवालातून श्रीदेवाच्या मंदिर परिसरात झालेल्या सोयीसुधारणांची माहिती आपल्यापर्यंत पोहोचवण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न या अहवालाच्या माध्यमातून केलेला आहे.

अहवालामध्ये रु. ५०० च्या वरील देणगीदारांचीच यादी प्रसिद्ध केली आहे. तसेच सुवर्णकलशासाठी ज्यांनी या आर्थिक वर्षात देणगी दिली त्यांचीही नावे प्रसिद्ध केली आहेत. अहवालामध्ये देणगीदारांसाठी काही 'महत्त्वाच्या सूचना' केल्या आहेत. कार्तिकोत्सवाचे निमंत्रण याच अहवालातून दिले आहे. भक्तनिवासातील सोयीसुविधांची माहिती दिली आहे की जेणेकरून आपल्याला त्याचा अंदाज येईल.

मित्रहो या वर्षी 'Shri Dev Anjaneshvar Devasthan' या फेसबुक पेजवर दि. २३ ऑगस्ट २०२० पासून म्हणजे गणेश चतुर्थीच्या दिवसांपासून मी अनेक वेगवेगळ्या विषयांवर पोस्ट लिहून व त्यासोबत सपोर्टिव्ह लिंक देऊन सविस्तर माहिती, स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न अत्यंत जाणीवपूर्वक केला आहे व यापुढेही करणार आहे. श्रीदेव अंजनेश्वर देवस्थानचे बाबतीत सर्वच्या सर्व माहिती देण्याचा प्रयत्न मी करणार आहे. एखाद्या विषयाची नीटपणे उजळणी व्हावी, कोणताही गैरसमज राहू नये या हेतूने पोस्ट लिहून सोबत लिंक पुरविण्याचा खटाटोप सुद्धा केला आहे. पारदर्शी काम सर्व लोकांच्या नजरेसमोर रहावे या हेतूने सर्वच्या सर्व माहिती देण्याचा मानस आहे. सन २००७-०८ पासूनचे सर्व ऑडीट रिपोर्ट, सन २००७-०८ पासूनचे दोन पंचवार्षिक अहवाल व त्यानंतरचे तीन वार्षिक अहवाल, मुदत ठेव सर्टिफिकेट्स, देवस्थान परिसरात सन २००३-०४ पासून झालेली शासकीय योजनेतील विकास कामे व त्यांचे फोटो, अंजनेश्वर राखीव संचित स्व-निधीतून झालेल्या सोयीसुधारणा याची माहिती फोटो सह देण्याचा प्रयत्न केला आहे... देवस्थान जमीनीबाबतच्या घडामोडी तपशिलासह देण्याचा प्रयत्न फेसबुक माध्यमातून मी केला आहे.. कुणाच्या व्यक्तिगत रागालोभाचा विचार न करता सर्व सर्व काही या फेसबुकच्या माध्यमातून मी आपल्या पर्यंत पोचविण्याचा प्रयत्न केला आहे. 'सत्य उजेडी रहाणे आवश्यक असते,'.. श्री देव अंजनेश्वर आपणा सर्वांचाच असल्यामुळे त्याची सर्व माहिती आपणा सर्वांना हवी, म्हणून हे सर्व आपणांपर्यंत पोहोचते केले आहे... प्रत्येक पोस्टवर कॉमेंट करण्याचे स्वातंत्र्य आपणासर्वांस दिलेले आहे, जेणे करून कारभारातले दोष आम्हाला

समजतील व ते दुरुस्त करता येतील. अनेक लोकांनी कॉमेंट केलेल्याही आहेत. जास्तीतजास्त भाविकांनी, देणगीदारांनी 'Shri Dev Anjaneshvar Devasthan' या फेसबुक पेजला जोडून घ्यावे, अशी माझी या अहवालाच्या निमित्ताने विनंती आहे...

देवस्थान ट्रस्टची सर्व वार्षिक जमा, सर्व वार्षिक खर्च, अकौंटिंग, ऑडीट रिपोर्ट, प्रसाद अंगारा पाठवणे, सोयीसुविधांची कामे करणे, आदी सर्व 'एकहाती' 'एका सहीने' व ट्रस्ट इंन्स्ट्रुमेंटच्या आधाराने होत असल्यामुळे या सर्व जमाखर्चाची नैतिक व कायदेशीर जबाबदारी माझी एकट्याचीच रहाते. ही बाब सुद्धा मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे. कुणाही देणगीदाराला अथवा देवस्थानशी हितसंबंधित असामीला काही शंका, समस्या, माहिती अथवा तक्रार करायची असेल तर खालील मोबाइल क्रमांकावर अथवा मेल आयडी अथवा फेसबुकवर जरूर करावी. या बाबत अजिबात संकोच बाळगण्याचे कारण नाही... 'जे बरोबर असेल ते सर्वांचेच आहे, चुकीचे असेल ते माझे' असेल असेच समजावे... अहवालाच्या निमित्ताने आपल्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला आहे. श्रीदेवाला विचारावे व कामाला लागावे, असा सामान्यपणे माझा काम करण्याचा शिरस्ता आहे. 'माझे मागे कोण आहे', हे मी कधीच वळून पहात नाही. 'श्रीदेव पाठीमागे उभा आहे', असे गृहीतक धरून कामकाज करायचे...

डॉ. प्रकाश बाबा आमटे नावाच्या चित्रपटात एक सुंदर प्रार्थना आहे..

"तू बुद्धी दे, तू तेज दे, नवचेतना विश्वास दे ।
जे सत्य सुंदर सर्वथा, आजन्म त्याचा ध्यास दे ।
सन्मार्ग आणि सन्मती, लाभो सदा सत्संगती ।
नीती नाही भ्रष्ट हो, जरि संकटे आली किती ।
पंखास या बळ दे नवे, झेपावण्या आकाश दे ।
जे सत्य सुंदर सर्वथा, आजन्म त्याचा ध्यास दे ॥"

"हे देवा, सत्य, सुंदर काम करण्यासाठी चांगली विवेकाची बुध्दी दे, चैतन्य दे आणखिन ते काय पाहिजे."...

'तू पुढे हो, मी पाठीमागून आहेच' हा एकमेव आदेश माझेसाठी पुरेसा होतो आणि मी कामाला लागतो... श्रीदेव अंजनेश्वर आमच्यासाठी सर्व काही आहे.... सेवा करण्याचे सौभाग्य मिळते आहे, ही आमच्या पूर्वजांची पुण्याई असावी.. असो... पुनश्च सर्वांना नमस्कार असावा ..

आपला नम्र,

**विश्वस्त,**
**श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे**
संपर्कासाठी मोबा.9823277326 (WhatsApp)
9284388731 / 7038785001
ई-मेल आयडी- shridevanjaneshwar@gmail.com

***(विश्वस्त म्हणून नाव छापण्याची गरज वाटली नाही... कामकाज कुणी केले, लिखाण कुणी केले आहे हे आपण सर्वजण जाणता आहात... माझे अस्तित्व श्री देव अंजनेश्वरच्या नावात सामावलेले आहे... त्यामुळे श्री देवाचे नाव मोठे झाले की आपण त्यात आलोच... शिवाय नाव देऊन कार्य करण्याने कार्याचे पुण्य हरपते, गाठी पडत नाही... म्हणूनसुध्दा नाव छापायचा विचार केला नाही... फोन नंबर माझ्या नावासाठी पुरेसे बोलके आहेत.)

# महत्त्वाच्या घटनांचा, कामकाजाचा गोषवारा ....

- **कोरोना अर्थ सहाय्यता निधी** .... मे. धर्मादाय आयुक्तांच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून पंतप्रधान सहाय्यता निधीला रु. ११ हजार व मुख्यमंत्री सहाय्यता निधीला रु. ११ हजाराचा कोविड मदत निधी पाठविण्यात आला. दोन्ही देणग्या १००% आयकरसूट मिळवून देणाऱ्या आहेत. यापूर्वी सांगली, कोल्हापूरला झालेल्या महापुराचे वेळीही देवस्थानकडून मदत सहाय्य देण्यात आलेले आहेच. त्याचा उल्लेख मागील अहवालात आलेला आहे...

- **इन्व्हर्टरच्या बॅटऱ्या बदलल्या**.... रु. २५००० खर्च करून इन्व्हर्टरच्या बॅटऱ्या बदलल्या. गोव्याच्या भुस्कुटे बंधूंनी ५/६ वर्षांपूर्वी श्रीदेवाला इन्व्हर्टर दिलेला आहे. ५/६ वर्ष झाल्याने बॅटरी बदलणे क्रमप्राप्त झाले. एक्साईड कंपनीकडून बॅटरी खरेदी केलेली आहे... जुन्या बॅटरीचे मूल्य वजा करून रक्कम देण्यात आली आहे...

- **इन्व्हर्टरचा मेंटेनन्स**... श्री. दीपक गोरे, राजापूर यांचेकडून करून घेण्यात आला... मंदिरातील व कळसावरील इन्व्हर्टरचा मेंटेनन्स करून घेण्यात आला आहे.

- **केसिंग सुरक्षा... सी. सी. टी. व्ही. वायरिंग साठी सुरक्षा**... श्रीदेवाचे संपूर्ण मंदिर व सभोवतालचा संपूर्ण परिसर सी. सी. टी. व्ही. कव्हरेज खाली आणण्यात आला आहे. तथापि सी. सी. टी. व्ही. चे वायरिंग उघडे होते, केसिंग केलेले नव्हते. श्री. गिरीश करंबेळकर यांच्या जी. के. इंटरप्राईज कडून सर्व केसिंगचे काम व अन्य किरकोळ मेंटेनन्स काम करून घेण्यात आले आहे.

- **लिंगायत सेवा मानधन**... सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये श्री. सदानंद तुकाराम लिंगायत, श्री. संतोष वामन लिंगायत, श्री. जगन्नाथ दत्तात्रय लिंगायत व श्रीम. अश्विनी अनंत लिंगायत या चौघांना प्रत्येकी प्रतिमहिना रु. २५०० 'सेवा मानधन' चालू करण्यात आले आहे. तसेच वर्ष २०२०-२०२१ या आर्थिक वर्षामध्येही हे 'सेवा मानधन' कायम करण्यात आले. यात चालू वर्षाला श्री. सुधाकर कृष्णा लिंगायत यालाही 'सेवा मानधन' चालू करण्यात आले आहे. हे 'सेवा मानधन' बँकेतून प्रतिमहिना त्यांचे त्यांचे बचत खात्याला ट्रान्स्फर होत आहे. या बदल्यात काही ठराविक कामे प्रत्येकाला योजून देण्यात आली आहेत. या आर्थिक वर्षीचे 'सेवा मानधन' देताना जाहीर नोटीस व लाभार्थींचे 'स्वयं घोषणापत्र' करून घेतलेले आहे. ज्यांना मानधन स्वीकारण्याची गरज वाटली नाही त्या लिंगायत लोकांनी ते स्वीकारले नाही. परिणामी पाचच लिंगायत लाभार्थ्यांना वर्ष २०२०-२१ चे 'सेवा मानधन' चालू ठेवण्यात आले आहे.

- **मूकशाळेच्या छप्पराचे रंगकाम**... भोगले कोटिंग ॲण्ड पेंट्सचे मालक श्री. नित्यानंद जयंत भोगले(देसाई), औरंगाबाद यांच्या पुढाकारातून हे रंगकाम हाती घेण्यात आले. लाकडाचा टिकाऊपणा वाढावा, हवेपासून, पाण्यापासून संरक्षण व्हावे या हेतूने वॉरनिश पेंट वापरून मंदिराच्या मूकशाळेच्या भागाच्या छप्पराचे रंगकाम करण्यात आले. सर्व लाकूड सामान पॉलिश पेपरने घासून वॉरनिश पेंटचे दोनदा कोटिंग करण्यात आले. हे रंगकाम करीत असताना खराब झालेले किरकोळ लाकूडसामान बदलण्यात आले आहे... कौलांना आतून पेंट काढण्यात आला आहे. स्थानिक सेवेकरी मंडळींनी, सुतार समाजातील मंडळींनी या कामात हातभार लावला आहे.

- **भक्तनिवासाच्या जिन्याचे काम**... भक्तनिवासातील वरच्या मजल्यावर निवास करणाऱ्या यात्रेकरूंना संडास बाथरूमला सहजपणे जाता यावे म्हणून स्वतंत्र जिन्याचे बांधकाम करण्यात आले आहे... जांभा चिरा वापरून जिन्याचे बांधकाम करण्यात आले आहे. श्री. नरेश कांबळी, संतोष शिंदे व श्री. संतोष मसूरकर यांनी पुढाकार घेऊन हे काम केले. तर रेलिंगचे काम श्री. सय्यद हसोळकर यांनी केले आहे ...

- **श्रीदेवाची जमीन... समज गैरसमज**... देव वहिवाटीच्या जमिनी त्या देवतेच्या मालकीच्या असतात. त्या जमिनी देवतेसाठी दिलेल्या असतात. त्या जमिनी केवळ आणि केवळ वहिवाट करण्यासाठी, शेती करण्यासाठी वहिवाट दारांच्या ताब्यात असतात. त्यामधील वहिवाटदार पुजारी अथवा अन्य व्यक्ती त्या जमिनीचा 'मालक'

नसतो. जमीन वहिवाटीच्या उत्पन्नाच्या बदल्यात पूजाअर्चा करणे, झाडलोट करणे, नैवेद्य आदीचा खर्च करणे अपेक्षित असते.. या जमिनी वहिवाटीच्या अधिकाराने, वंशपरंपरेने येतात. या जमिनीचे हस्तांतरण, विक्री, वाटप, बक्षीसपत्र, गहाणखत करता येत नाही. या जमिनीतील मातीही विकता येत नाही, दगड विकता येत नाहीत, रानटी झाडे विकता येत नाहीत, ही बाबही लक्षात घेतली पाहिजे.

संदर्भ- १) एड. राम शेलकर यांचे सात बारा व हक्क नोंद पुस्तक

२) निवृत्त तहसीलदार श्री. रा. वि. भुसकुटे यांचे चौधरी पब्लिकेशनचे पुस्तक

३) महाराष्ट्र शासन निर्णय परिपत्रक क्र. डीईव्ही -२०१० /प्र. क्र. ९ /ल-४ महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई ४०००३२ दि. ३० जुलै २०१० व शुद्धिपत्रक दि. २९.०६.२०११ मध्ये देवस्थान जमिनीबाबत व त्यामधील बेकायदेशीरपणाला पूर्वस्थिती आणण्याबाबत उपाययोजना केल्या आहेत. तसेच

४) जगन्नाथ कुसाजी सावंत वि. महाराष्ट्र शासन यामध्ये मे. हायकोर्ट मुंबई यांनी दि. २२ जानेवारी २०२० मध्ये अंतिम आदेश करून वरील शासन निर्णयाची अंमल बजावणी मुदत मर्यादित करण्यास सांगितले आहे.

'श्रीदेव अंजनेश्वर वहिवाट' असे शीर्षक असलेल्या जमिनी मिठगवाणे, जानशी, माडबन, मौजे होळी, मौजे जैतापूर या महसुली गावात आहेत. 'श्रीदेव अंजनेश्वर वहिवाट' अशी नोंद जोपर्यंत सातबाराला आहे तोपर्यंत या जमिनींची विक्री करता येत नाही किंवा बक्षीस पत्रानेही देता येत नाही. महाराष्ट्र शासनाने सन २०१० मध्ये एक शासन निर्णय करून या जमिनींचा शोध घेण्याची मोहीम चालू केली आहे. त्यातील बेकायदेशीरपणाला पूर्वस्थिती आणण्यासाठी त्या शासन निर्णयात स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी यांना देण्यात आले होते. कुसाजी सावंत वि. स्टेट ऑफ महाराष्ट्र या मुंबई हायकोर्ट कडील न्याय निर्णयात सन २०२० मध्ये अंतिम आदेश पारित झाला. त्यानुसार राजापूर तालुक्यातील देवस्थान इनाम जमिनीची शोध मोहीम हाती घेण्यात आली आहे. त्यानुसार श्रीदेव अंजनेश्वर वहिवाट जमिनी बाबत शोध मोहीम राबवून सध्याचे प्रांताधिकारी श्री. प्रवीण खाडे साहेब यांनी आदेश करून लेखन दोष दुरुस्तीचे काम राजापूरच्या तहसीलदारांमार्फत चालू करून सुमारे ३५८ सर्व्हे नंबर मधील जमीन क्षेत्रामध्ये लेखन दुरुस्ती केली आहे... 'श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे' हे ट्रस्टचे नाव कब्जेदार रकान्यात आणून वहिवाटदारांच्या नोंदी इतर अधिकार रकान्यात नोंदल्या गेल्या आहेत... तसेच सर्व जमिनींच्या नोंदी वर्ग ३ च्या देवस्थान इनाम जमीन रजिस्टरला नोंदवण्यात आल्या आहेत. तसेच या जमिनीतील कर्जबोजे, बिनशेती नोंदी, आणेवारीच्या नोंदी रद्द केल्या आहेत... तसेच काही फेरफेरामध्ये रिव्हिजन करून सुनावणी घेऊन पूर्वस्थिती आणली आहे. देवाच्या जमिनींवर मालकी अधिकार त्या देवतेचाच असतो पर्यायाने त्या देवतेचे कामकाज चालवणाऱ्या ट्रस्टचा असतो, ही बाब सुस्पष्ट झाली आहे. हे सर्व काम गाव दवंडी (beat of drum) ने नोटीस बजावणी करून झाले, हे विशेष आहे. स्वत: खरेदी केलेली जमीन व देवस्थानची जमीन यातील फरक सर्वांनी समजून घेतला पाहिजे... देवस्थान ट्रस्टला न सांगता कर्ज घेणे, बिनशेती करणे, बांधकाम करणे, वृक्षतोड करणे आदिबाबीना भविष्यात आळा बसेल. 'देवस्थानची जमीन केवळ कसवणूकीसाठी ताब्यात असते, त्यावर मालकी हक्क सांगता येत नाहीत', हे आत्ता अधोरेखित झाले आहे. भविष्यात जमिनीची विक्री झाली तरी त्या विक्रीची संपूर्ण रक्कम श्रीदेवाचीच राहील, ही बाब सुद्धा आत्ता सुस्पष्ट झाली आहे. एखाद्या शासकीय संपादनात श्रीदेवाची जमीन संपादण्यात आली तरी संपूर्ण रक्कम श्रीदेवालाच मिळेल, यात कुणीही संदेह ठेवण्याचे कारण राहिलेले नाही.

- **इमारत मालमत्ता... सातबारावर नोंदणी...** श्रीदेव अंजनेश्वर मंदिरासह सभोवताली असणाऱ्या एकूण १३ इमारत मालमत्ता नोंदण्याचे काम महसूल दप्तरी पूर्ण झालेले आहे. फेरफार क्रमांक ७५५० ही नोंद दि. ०५.०७.२०२० रोजी मंजूर करण्यात आली आहे व या १३ इमारतींच्या नोंदी सातबारा उताऱ्यावर करण्यात आल्या आहेत. स. नं. ६२/८३ मध्ये या इमारत नोंदी झालेल्या आहेत. या इमारत नोंदी लांबी रुंदी नोंदवून झाल्या आहेत. यामध्ये श्रीदेवाचे मन्दिर, श्री काळ भैरव मन्दिर, मागील धर्मशाळा, कलामंच, नगारखाना, भटारखाना, स्नानगृह, वाचनालय, भंगार समान खोली, स्नानगृह व महिला शौचालय, सांस्कृतिक कला केंद्र, धर्मशाळेमागील महिला मुतारी या १३ इमारत

मालमत्ता महसूल दप्तरी नोंदण्यात आल्या आहेत. यामध्ये सांस्कृतिक कला केंद्र, महिला शौचालय, स्नानगृह या इमारतींना शासनाचा निधी खर्च झाला आहे. तसेच या इमारत मालमत्तेमध्ये देवस्थानचा निधीही खर्च झाला आहे. स्वाभाविकपणे या सर्व मालमत्ता महसूल दप्तरी व ग्रामपंचायत दप्तरी नोंदल्या जाव्यात, व इमारतींचे मालकी अधिकार देवस्थानकडे रहावेत यासाठी हा प्रयत्न करण्यात आला आहे. या सर्व मालमत्ता देवस्थानच्या मालमत्ता रजिस्टरला नोंदवून त्यांची नोंद धर्मादाय दप्तरी होण्यासाठी हे पूर्वतयारीचे प्रयत्न चालू आहेत.

- **आनंद वाचनालय बंद झाले... उपक्रम बंद झाला...** आनंद वाचनालय मिठगवाणे ही संस्था मिठगवाण्यात कै. ह. वा. कामत तथा कामत सर यांनी सन १९७६ ला स्थापन केली होती.. मात्र वाचनालयाला फारशी चालना मिळालेली नव्हती. शासन अनुदान मिळविण्यासाठी प्रयत्न झाले नव्हते... वाचनालयात एकही पुस्तक पहायला मिळाले नाही, अशी अवस्था होती. असे वाचनालय पुनरुज्जीवित करून सन २००१ मध्ये शासकीय अनुदान चालूझाले. श्री. मदन हजेरी, स्पर्श प्रकाशन व कै. भरत बळवंत गोखले यांनी या कामी सहकार्य केल्याने शासन मान्य ग्रंथालयाचा 'क' दर्जा नंतर 'ब' दर्जा मिळवता आला. सुमारे साडेआठ हजाराची ग्रंथसंपदा तयार झाली. कै. रविकांत शशिकांत ऊर्फ राजू लिंगायत, कै. अनंत रघुनाथ लिंगायत, श्री. रविकांत वसंत लिंगायत, श्री. मनोहर गणपत लिंगायत, कु. प्रियांका रविकांत लिंगायत, कु. ज्योती नरेश कांबळी, कु. श्रुती संजय चेऊलकर, कु. संजीवनी सदानंद लिंगायत, कु. नूतन नरेश कांबळी, कु. मयुरी विजय राणे, कु. आरती पांडुरंग तांबे आदींनी यामध्ये ग्रंथपाल, लिपिक, शिपाई या पदावर अल्प मानधनावर कामे केली आहेत.. याचे ऑडीट अकौंटिंग श्री. निलेश पाटणकर सी. ए. यांचेकडून नियमितपणे झालेले आहे... रोज पाच-सहा स्थानिक वृत्तपत्रे, १५/२० मासिके या वाचनालयात नियमितं येत होती... गेल्या दोन तीन वर्षामध्ये वाचकांचा अतिअल्प प्रतिसाद लक्षात घेऊन वाचनालय बंद करण्याचा निर्णय मी घेतला आहे.. या वाचनालयाचा श्रीदेव अंजनेश्वर देवस्थानशी थेट आर्थिक संबंध नसला तरी अंजनेश्वरच्या परिसरातील हा उपक्रम बंद पडला असल्याने आपणा सर्वांना या माध्यमातून कळविला आहे. चांगला उपक्रम बंद होतो तेव्हा मनस्वी दुःख होते. जो तो उपक्रम परिश्रमाने राबवतो त्याला ते असह्य होते. वाचनालयाची इमारत, ८/९ कपाटे, खुर्च्या, टेबल, विद्युत मीटर व सर्व ग्रंथ संपदा ही सर्व मालमत्ता श्रीदेव अंजनेश्वरच्या स्वाधीन तूर्तास ठेवण्यात आलेली आहे. विद्युत मीटरसह इमारत मालमत्ता श्रीदेव अंजनेश्वर देवस्थानच्या नावे करण्याचे काम हाती घेतले आहे...

- **दानपेटी ...** श्रीदेवाच्या मंदिरात अद्याप पर्यंत दानपेटी बसविण्यात आलेली नाही. याचा अर्थ दानपेटी बसणारच नाही असा होत नाही. आत्ता पर्यंतच्या देसाई ट्रस्टींनी उदार धोरण ठेऊन व पुजाऱ्यांची आर्थिक परिस्थिती आणि त्यांचे हित लक्षात घेऊन 'दानपेटी' बसविण्याचा विचारही केलेला नाही. पूर्वी नाणी वगळता चलनी नोटा विश्वस्तांकडे आणून देण्याचा व ट्रस्टला जमा करण्याचा एक प्रघात होता. ही बाब सुद्धा देसाई कुटुंबाच्या ट्रस्टींनी फारशी विचारात न घेता आजपर्यंत उदार धोरण स्वीकारले आहे. देवाच्या पुढ्यातील सर्व चलनीनोटा लिंगायत पुजारीच स्वीकारतात. अनेक मंदिरांमध्ये दानपेट्या बसविण्यात आल्या आहेत. अनेक भाविकांना 'गुप्त देणगी' देण्याची इच्छा असते, ती इच्छा दानपेटीने पूर्ण होते. धर्मादाय कार्यालये सुद्धा दानपेटी बसविण्यासाठी आग्रही असतात व त्यासाठी सहजपणे आदेशही देत असतात. श्रीदेव अंजनेश्वर ट्रस्टचा विचार करता मंदिरात दानपेटी बसविणे अथवा न बसविणे हे सर्वस्वी जनरल अफेअरचे विश्वस्त देसाई यांचेवर अवलंबून आहे, ही बाब विशेषतः पुजारी मंडळींनी लक्षात घेतली पाहिजे. सद्यस्थितीमध्ये पुजारी लिंगायत असामींमध्ये अकारण गैरसमज पसरविण्याचे धोरण दिसून येत आहे. हे अन्य सुजाण लिंगायत मंडळींनी वेळीच थांबवले नाही तर दानपेटी बसवून पगारी पुजारी व्यवस्था सुद्धा निर्माण करता येईल. सुधारणा करण्याची संधी जवळपास चारपाच वर्ष दिल्यानंतर दानपेटीचा विचार पुढे येत आहे. हा मुद्दा अहवालात नमूद करणे योग्य वाटत नसले तरी एक सूचित करून ठेवणे (intimation) योग्य वाटते.

- **ट्रस्टबाबतचे दोन शब्द...** याबाबत सन २०१२-१७ या पंचवार्षिक अहवालात पान क्र. १६ व १७ वर ट्रस्टबाबतचे 'दोन शब्द' छापले आहेत. श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे या सन १९५२ साली नोंदलेल्या ट्रस्ट मध्ये देसाई ट्रस्टींना व्यवस्थापनाचे जवळपास सर्व अधिकार वंशवारस पद्धतीने दिलेले आहेत. असे असले तरी

तारतम्य बाळगून कारभार करण्याचाच प्रयत्न आजपर्यंतच्या सर्व देसाई घराण्यातील सर्व ट्रस्टींनी केलेला आहे. ट्रस्टची नोंदणी होताना दि. १७.११.१९५२ रोजी मे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, कोल्हापूर यांनी जे आदेश केले आहेत त्यानुसार ट्रस्टचे व्यवस्थापन अपेक्षित आहे. राजीनामा देऊन कार्यमुक्त झालेल्या विश्वस्ताने आपला वारस उत्तराधिकारी नेमणे हे आवश्यक आहे. वंशवारस विश्वस्त व्यवस्था (Hereditary mode of succession) असल्याने विश्वस्त हयात असतानाही आपला वारस नेमू शकतो. केवळ मृत्यू पश्चातच वारस नेमला जातो, असा त्याचा अर्थ होत नाही. मृत्यू पावलेल्या विश्वस्तांचे जागी त्या विश्वस्ताचे कायदेशीर वारस यांनी विश्वस्त पद घेण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे तर राजीनामा देऊन कार्यमुक्त झालेल्या विश्वस्तांनी आपला कायदेशीर वारस विश्वस्त पदावर आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. मृत्यूमुळे विश्वस्त पद समाप्त होत असले तरी मृत्यू दाखला देऊन नाव कमी करण्याची प्रोसेस जोपर्यंत होत नाही तोपर्यंत मयत विश्वस्तांचे नाव धर्मादाय दप्तरी नोंदलेले रहाते. तसेच राजीनामा देऊन कार्यमुक्त झालेल्या विश्वस्तांचे नाव जोपर्यंत वारस उत्तराधिकारी नेमला जात नाही तोपर्यंत धर्मादाय दप्तरी नोंदलेले रहाते. कार्यमुक्त झालेल्या विश्वस्तांनी आपला वारस उत्तराधिकारी नेमणे आवश्यक आहे.

● **बचत खात्याबद्दल बोलू काही**... मित्रांनो... या अहवालाच्या माध्यमातून मी आपल्याला अंजनेश्वरच्या 'बचत खात्या' बद्दल सुध्दा संपूर्ण माहिती देणार आहे... ऐकण्यासारखी आहे... माहिती 'रंजक' आहे... आणि 'मजेशीर' सुध्दा आहे... दि.२९.११.१९८२ रोजी बँक ऑफ इंडिया मिठगवाणे शाखा सुरू झाली... 'मिठगवाण्यात'... ग्रामपंचायत मिठगवाणेच्या इमारतीत शाखेचे उद्घाटन झाले... त्यादिवशीची गोष्ट... म्हणजे दि. २९.११.१९८२ रोजीची गोष्ट... त्यावेळी अंजनेश्वरचा कारभार 'चालक समिती' चालवायची. ना. ह. देसाई, स. पां. पाटणकर, बा. पां. परांजपे, बा. भि. शिरवडकर व ग. शं. लिंगायत... ही 'पंच चालक कमिटी'... दि.२९ नोव्हेंबर १९८२ रोजी देवस्थान 'चालक समितीने' बचत खाते बँकेमध्ये काढले...बँकेने या खात्याची नोंद क्रमांक १ वर केली... श्री. ना. ह. तथा नाना देसाई, श्री. बा. पां. तथा बाबल परांजपे व स. पां. तथा दादा पाटणकर यांच्या संयुक्त सहीने खाते सुरू झाले... 'श्री देव अंजनेश्वर देवस्थान मिठगवाणे', अशा नावाचे बचत खाते सुरू झाले... केवळ नारायण हरि देसाई यांच्या साध्या हस्तलिखित पत्राने ते खाते सुरू झाले... कोणतेही ट्रस्टचे डाक्यूमेंट न लावताच उघडलेले खाते... ना रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट ना ट्रस्टचा पीटीआर उतारा ना ट्रस्ट इंनस्ट्रुमेंटची प्रत... ट्रस्टबाबतचे कोणतेही कागदपत्र सादर न करता सुरू केलेले श्री देवाचे बचत खाते... कायदेशीर 'ट्रस्टीपण' नसताना उघडलेले बचत खाते... क्रमांक १ चे खाते...'श्री देव अंजनेश्वर देवस्थान मिठगवाणे' अशा नावाचे... श्री. गाडगीळ मॅनेजर व क्लार्क श्री. शशिकांत शंकरराव कुलकर्णी असतानाचे खाते... श्रीदेवाचे खाते आमच्या तीर्थस्वरूपांच्या साध्या पत्राने सुरू झाले, हे ही सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे... 'ट्रस्टीपदावर न येता' काढलेले बचतखाते, ही बाब सुध्दा अगदी स्पेसिफिक लक्षात ठेवावी... धर्मादाय दप्तरी चेंज रिपोर्ट क्रमांक ९५७/१९८३ हा नारायण हरि देसाई यांच्या अर्जाने झाला... व पीटीआर वर नारायण हरि देसाई, गोविंद गणेश देसाई, वसंत राजाराम लिंगायत व गणेश सदाशिव गोखले या चौघांची नावे दि. १७.०१.८४ ला पीटीआर वर नोंदली गेली... तरी सुद्धा देवस्थानचे खाते चालक कमिटीच्या चालकांच्याच सहीनेच चालू होते... त्यानंतर दोन तीन वर्षांनंतर खात्यात बदल करण्यात आला... बचतखात्यात तेव्हापासून वेळोवेळी व्यक्ती बदलल्या... मात्र खात्याचे नाव तसेच राहिले... 'श्री देव अंजनेश्वर देवस्थान मिठगवाणे'... अगदी सन २०१६ पर्यंत... देवाचा टिडीएस वाचविण्यासाठी मी पॅन कार्ड मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू केले तेव्हा प्रथमतः लक्षात आले की ट्रस्टच्या नावात 'देवस्थान' शब्दच नाही... पोलिस स्टेशन पासून अनेक सोपस्कार करून ट्रस्टचे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट मिळविले...'रजिस्ट्रेशन सर्टिफिकेटची दुय्यम प्रत'... तेव्हा खात्री झाली की 'देवस्थान' शब्द ट्रस्ट नोंदणीत नाही... ट्रस्टचे नाव होते 'श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे'... असे आहे... ट्रस्टचा पीटीआर घेतला व ट्रस्ट इन्स्ट्रुमेंटची सर्टिफाईड कॉपी घेतली... त्यातही 'श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे', असेच नाव नोंदलेले होते... अर्थात यात कुणाचेच काही चुकले होते, असे नाही... तत्कालीन सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री. जी. एम. साधले साहेब यांना प्रत्यक्ष भेटून ह्या नावाबाबतची सर्व हकीगत डॉक्यूमेंट दाखवून सविस्तर सांगितली... त्यांचेकडून माहिती घेतली... समजावून घेतले... सीए निलेश पाटणकर यांच्या सूचनेनुसार पॅन

कार्ड साठी अर्ज केला... 'श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे', अशी नोंद असलेले पॅन कार्ड मिळाले... मे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री. जी. एम. साधलेसाहेब यांनी दिलेल्या तोंडी मार्गदर्शनानुसार बॅक ऑफ इंडिया मिठगवाणे शाखेकडे दि. १५.०४.२०१६ रोजी रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट, पीटीआर कॉपी, ट्रस्ट इन्स्ट्रुमेंटची कॉपी, पॅन कार्ड, मयत ट्रस्टींचे मृत्यू दाखले, राजीनामा दिलेल्या ट्रस्टींची राजीनामा पत्रे, ट्रस्टबाबतची कॉमेंटरी आदी डॉक्यूमेंट हजर करून दुरुस्तीचा प्रस्ताव सादर केला... त्यावेळी बँकेमध्ये मॅनेजर पदावर होते 'श्री.प्रविणकुमार पोटनुरू साहेब'... 'दाक्षिणात्य मॅनेजर'... इंग्रजी माध्यमातून उत्तम संवाद साधणारे मॅनेजर... त्यांनी सर्व डाक्यूमेंटची स्क्रुटीनी केली व बँकिंगच्या दृष्टिकोनातून सर्व आवश्यक त्या सर्व दुरुस्त्या बचत खात्यात केल्या आहेत... तेव्हापासून हे बचत खाते 'माझ्या एकट्याच्या सही शिक्याने' चालू राहिले आहे व ही बाब मी देवस्थानच्या जनरल मिटिंगमध्ये वेळोवेळी सांगितलेलीही आहे व अहवालात सुध्दा छापलेली आहे... सन २०१६ नंतर या ट्रस्टमध्ये सुवर्ण कलशासाठी मोठा निधी जमा झाला व सुवर्ण कलशावर मोठी गुंतवणूक झाली... हे सर्व व्यवहार चेक द्वारेच झाले आहेत... शक्यतो क्रॉस चेक द्वारे झाले आहेत... प्रत्येक खर्चाचे व्हावचर चेक नंबर नोंदवूनच झाले आहे... जी माणसे कामाचे चेक स्वीकारतात त्यांना हे सर्व नीटपणे माहिती आहे... मला दैनंदिन व्यवहारात 'बोगस' काम करायची सवयच नाही... त्यामुळे सन २०१६ मध्ये सर्व ट्रस्टचे कागदपत्र देऊन श्रीदेवाच्या खात्यात दुरुस्ती केली आहे... स्वाभाविकतः मृत्यू-दाखल्यामुळे कै. भरत बलवंत गोखले यांचे नाव कमी झाले, श्री.बाळकृष्ण गोविंद देसाई यांची सन २००८ सालातील राजीनामा पत्रे होती, त्यातील मजकूर लक्षात घेऊन त्यांचे नांव कमी झाले... श्री.मनोहर गणपत लिंगायत व श्री. रविकांत वसंत लिंगायत यांचे ट्रस्टमधील अधिकार नित्य पूजाअर्चेपुरते मर्यादित असल्यामुळे त्यांचीही नावे कमी झाली आहेत... या ट्रस्टमध्ये 'जनरल अफेअर्सचे' सर्व अधिकार देसाई ट्रस्टीला असल्यामुळे व मोड ऑफ सक्सेशन मध्ये, 'आमच्या पाठीमागे आमच्या कुटुंबापैकी कुणीही कर्ता इसम असेल त्यांनी व्यवस्था पहाणेची आहे', ही स्पेसीफीक नोंद असल्यामुळे कोणतीच अडचण राहिली नाही... 'दोन देसाई कुंटुंबापैकी कुणीही कर्ता इसम' थोडक्यात एकाने बचत खाते चालवणे चुकीचे होणार नाही, याची खातरजमा तत्कालीन बँक अधिकारी श्री. प्रविणकुमार पोटनुरू यांनी केली होती व तसे करणे त्यांच्या अधिकाराचा भाग होते... श्री देव अंजनेश्वर देवस्थान मिठगवाणे हे नाव कमी करून 'श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे' अशी नांव दुरुस्तीही त्याच वेळी करण्यात आली... तसेच बचत खात्याला बँकेच्या सीस्टीम मध्ये 'पॅन कार्ड नंबर' त्याचवेळी अपलोड करण्यात आला आहे... तेव्हापासून माझे एका सही फोटोचे सिग्निचर कार्ड बँकेने आपल्या सिस्टीमला अपलोड करून घेतले... माझेकडून केवायसी फार्म भरून घेतला... त्यात माझा फोन नंबर व आधार नोंदणी करून घेतली... नवीन नावाची नोंद झाल्यावर नवीन नांवाचे चेकबुक पुरवले... या बँकखात्याच्या कस्टमर आयडीला shridevanjaneshwar@ gmail.com हा ई-मेल आयडी सद्धा जोडून घेण्यात आला आहे... यामुळे ट्रान्झेक्शनचे मेसेज मोबाईल व ई-मेल द्वारे येतात... तसेच महिन्याचे बँक स्टेटमेंट ई-मेल वर मिळते... सन २०१६ पासून हे देवाचे बचत खाते 'ट्रस्ट इन्स्ट्रुमेंट नुसार' चालते आहे, हेही मी अत्यंत 'नम्रपणे' व 'ठामपणे' सांगून ठेवत आहे... सन १९८२ ते २०१६ पर्यंत या बचत खात्याला ट्रस्ट रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट, पीटीआर, इन्स्ट्रुमेंटची प्रत, पॅन कार्ड, नाव बदलासाठीचा अर्ज आदी महत्त्वाचे दस्तऐवज पुरवलेच नव्हते... अर्थात पूर्वीच्या सर्व चालक मंडळींनी, विश्वस्त मंडळींनी श्री देवाच्या बँक खात्याचा व्यवहार अगदी सचोटीने व प्रामाणिकपणे केलेला आहे, हेही नोंदवून ठेवले पाहिजे... ट्रस्टचे बँक खाते 'ट्रस्ट इन्स्ट्रुमेंट' च्या मार्गदर्शक तत्वानुसारच चालले पाहिजे व तसा प्रयत्न सन २०१६ पासून मी चालू ठेवलेला आहे... श्री देवाला समोर ठेवून बँकखाते चालवले की कोणतीही समस्या, अडचण उद्भवणार नाही, असा माझा दृढ विश्वास आहे... अर्थात सर्व जमा व सर्व खर्च याची सर्वस्वी जबाबदारी माझी एकट्याचीच रहाते, हेही इथे मी नोंदवून ठेवत आहे...

- **कोरोना संकट... मन्दिर बंदी... पूजा मानधन...** रविवार दि. २२ मार्च २०२० रोजीपासून श्रीदेव अंजनेश्वर मंदिराचे प्रवेशद्वार कुलुपबंद आहे. कोरोना रोगाच्या प्रसारामुळे सरकारी आदेश निघाले. मंदिराचे प्रवेशद्वार बंद करावे लागले. दि. ०५ एप्रिल २०२० रोजी मे. सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. दिलीप काळे साहेब यांनी मंदिराला प्रत्यक्ष भेट देऊन मंदिराचे प्रवेशद्वार पुढील आदेश येईपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश सर्व संबंधित लिंगायत वर्गाला बजावले आहेत...

पूजाअर्चा नियमित पार पाडली जावी म्हणून पुजारी नेमणुका करून पूजाअर्चा, झाडलोट आदी कामे करून घेण्यात आली आहेत... याबाबत 'पूजा मानधन' रु. २००० लिंगायत गुरवांना बँक ट्रान्स्फरने देण्यात आले आहे. मंदिर बंदी श्रीदेवी मुहूर्ताई मंदिरालासुद्धा लागू असल्याने तेथील पुजारी गुरवांना सुद्धा 'पूजा मानधन' देण्यात आले आहे...

- **श्रीदेवी मुहूर्ताईचा सन २०१९ चा नवरात्री उत्सव... वाढते स्वरूप**... स्वर्गीय नाजाबाई कांबळीची गुरवखी असल्याने श्री. सुधाकर लिंगायत याला श्री देवीची नित्य पूजा करण्यासाठी नेमण्यात आले होते... पत्नीचे अकाली निधन झालेले असतानाही श्री. सुधाकर लिंगायत यांनी श्री देवीची नित्य पूजाअर्चा करण्यास होकार दिला... या कालावधीतच देवीचा दसरा उत्सव आल्याने सर्व कामकाज श्री. सुधाकर लिंगायत याने पार पाडले... देवीचे दागिने ताब्यात घेतल्यापासूनची सर्व जबाबदारी पार पाडली... हा त्याचा सहयोग कधीच विसरता येणार नाही... त्याच्या पुढाकाराने सर्व काही शक्य झाले हे इथे अगदी नि:संदेह नमूद करत आहे... श्री. महेश कांबळीने सुद्धा या उत्सवात सर्व सहकार्य जबाबदारीने केले... श्रीदेवी मुहूर्ताईच्या नवरात्र उत्सवामध्ये भजन, दांडिया, हळदीकुंकू समारंभ आदी कार्यक्रम आयोजित करून उत्सवाची शोभा वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात आला आहे. आरती धुपारती ठिक ९.०० वाजता सुरु झाल्यामुळे भाविक भक्तांची उपस्थिती लक्षणीय वाढलेली आहे. विशेषत: महिला वर्गाने या उत्सवाला मोठ्या संख्येने आपली उपस्थिती लावली आहे. जवळपास २००-२५० भक्तमंडळी या उत्सवामध्ये नियमितपणे उपस्थित राहिली आहेत. उत्सवात 'होममिनिस्टर' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.. यामध्ये सौ. चव्हाण यांनी पैठणी जिंकली व सौ. सारिका संतोष लिंगायत यांना द्वितीय बक्षीस देण्यात आले... उत्सवामध्ये प्रतिदिन प्रसाद वाटप, त्यासाठी दाता शोधणे आदी कामात श्री. मनोज परमार (भावजी) यांनी आपले मोलाचे योगदान दिले आहे. यामुळे या उत्सवाला नवी उभारी आली आहे. सर्व गावकर मंडळींच्या सहकार्यातून हा उत्सव अधिक मोठा करण्याचा मानस आहे.

- **श्रावण दिंडी**... सोमवार दि. १९.०८.२०१९ रोजी श्रीदेवाची श्रावण दिंडी श्रीदेवी भरत दुर्गा मंदिर, होळी या ठिकाणी नेण्यात आली होती. सुमारे ६००/७०० भाविक भक्तांची उपस्थिती यावेळी लाभली होती. या दिंडीची क्षणचित्रे अनेक भाविक भक्तांना फेसबुकद्वारे, व्हॉट्सअॅपद्वारे पाठविण्यात आली आहेत. हा कार्यक्रमही अत्यंत शिस्तबद्धपणे व वेळेत पार पडला. श्रीदेवी भरत दुर्गा मंदिरामध्ये मंदिर प्रमुख श्री. विघ्नेश भरत गोखले व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेले स्वागत उत्स्फूर्त असेच होते. श्रावणदिंडीचा अनुभव घेण्यासाठी एकदा तरी अवश्य या, असेच सुचवावेसे वाटते.

- **झेंडूच्या फुलांची रोषणाई**... कार्तिकोत्सवामध्ये झेंडूच्या फुलांची सजावट करण्यात आली होती. सुमारे ११ हजारांची झेंडूची फुले 'बागेतल्या सुतार' परिवाराने खर्च करून आणली. येथील काजवे, कांबळी सेवेकऱ्यांच्या सहकार्याने माळा गुंफल्या, सभामंडप सजवला, मंदिर सजवले. फुलांची रोषणाई झाली ...

- **सत्कार गुणवंतांचे** ... दहावी शालांत परीक्षेत साने गुरुजी विद्यामंदिर जानशी प्रशालेत प्रथम आलेल्या कु. मोहिनी मंगेश मयेकर व कु. सारिका संतोष दांडेकर, द्वितीय क्रमांक आलेल्या कु. शांभवी बलवंत सुतार व तृतीय क्रमांकाच्या कु. जान्हवी राजा काजवे या चारही मुलींचा प्रत्येकी रु. १०००, ड्रेस सेट व श्रीफळ देऊन कु. मुक्ताई देसाई हिच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

- **देणगीदारांना लाडू प्रसादाचे वाटप**... देवाचे सेवेकरी व बँक ऑफ मिठगवाणे शाखेचे शाखाधिकारी श्री. विजय गवाणकर यांच्या आग्रही सूचनेनुसार उत्सवामध्ये देणगी रक्कम देणाऱ्या सर्व देणगीदारांना प्लास्टिक पिशवीत पॅक केलेला बुंदी लाडू वाटण्यात आला. सुमारे १००० लाडू वाटप करणेत आले. अनेक देणगीदारांनी विशेषत: मुंबईकरांनी या उपक्रमाचे तोंडी व लेखी पत्र पाठवून समाधान व्यक्त केले आहे. हा उपक्रम यापुढे चालू ठेवण्याचा प्रयत्न आहे. त्यासाठीही प्रायोजक, देणगीदार मिळत आहेत.

● **उत्सवातील सार्वत्रिक चहा वाटप**... उत्सवामध्ये सेवेकरी लोकांना मर्यादित चहापान व्यवस्था असते. देवस्थानच्या जनरल मिटिंग मध्ये सार्वत्रिक चहापान वाटप करावे, अशी सूचना मांडण्यात आली. उपस्थिती व खर्च याचा विचार करता, ही सेवेकरी सूचना शिरसावंद्य मानून सार्वत्रिक चहा वाटप करण्यात आले. झालेल्या खर्चाला देणगीदार मिळाला व त्यांनी सार्वत्रिक चहा वाटपाच्या खर्चाची जबाबदारी कायम स्वरूपी स्वीकारली आहे. 'योजकस्तु दुर्लभ:' म्हणतात, ते योग्य आहे. पैशाची कमी पडत नाही, योजना महत्त्वाची आहे.

● गेल्या वर्षीच्या कार्तिकोत्सवामध्ये चौथ्या दिवशी समस्त चेऊलकर कुटुंबियांनी एकत्र येऊन शोभायात्रेचे आयोजन केले होते... ढोल-तासे, फटाके, बनाटीचा खेळ करत त्यांच्या कुलदेवतेची पालखी घेऊन शिवाजी पुतळा ते अंजनेश्वर मंदिर अशी शोभायात्रा काढली होती... सुमारे दीडशे-दोनशे चेऊलकर कुटुंबियातील महिला पुरुष यात सहभागी हाते... सहज कल्पना सुचली होती व ती मी विलास चेऊलकर यांचेपाशी बोललो होतो व त्यांनी मनावर घेऊन समस्त चेऊलकर कुटुंबियांना एकत्र करून हा कार्यक्रम पार पडला... अर्थात नंतर सर्वच चेऊलकरांनी अगदी मनापासून सहभाग घेतला... पेनपेन्सील, साड्या आदीचे वाटपसुद्धा त्यांच्यावतीने करण्यात आले... चेऊलकरांची शोभायात्रा गेल्यावर्षीच्या उत्सवाचे आकर्षण ठरले...

● **ध्वनीचित्रफीत... पेनड्राईव्हच्या मदतीने**... कार्तिकोत्सव, महाशिवरात्री उत्सव, होळी उत्सव, श्रावण दिंडी याचे व्हिडीओ शुटींग श्री. प्रशांत भडेकर, जैतापूर यांनी केले आहे.. या सर्वांची एकत्रित ध्वनीचित्रफीत तयार करण्यात आली आहे.. त्यातील काही अंश श्रीदेवाच्या फेसबुक पेजवर अपलोड करण्यात आले आहेत... अनेकांना ही ध्वनीचित्रफीत व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून पाठविण्यात आलेली आहे. श्री. प्रशांत भडेकर यांनी अगदी कमी व अगदी अल्प मानधन घेऊन ही ध्वनीचित्रफीत बनविली आहे.

● **लग्न समारंभाची सोय**... या वर्षी कोरोना संकटामुळे देवस्थानच्या प्रांगणात लग्न समारंभ होऊ शकले नाहीत. गेल्या वर्षामध्ये एकूण ७ लग्न समारंभ देवस्थानच्या प्रांगणात पार पडले. नाममात्र भाडे घेऊन देवस्थानचा परिसर, देवस्थान मधील भांडी सामान, दोनशे खुर्च्या, बैठकीसाठी टेबल, मंडप व्यवस्था, जनरेटर, निवास व्यवस्था आदी उपलब्ध सोयीसुविधा लग्न समारंभासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. एकूण अनुभव पहाता अजूनही सोयीसुविधा करण्याचा विचार आहे ..

● **अद्ययावत दप्तर सुरक्षा**... सन २००७ ते २०२० पर्यंतचे ऑडीट रिपोर्ट, कीर्द-खतावण्या, बँक पासबुके, व्हावचर फाइल्स, देणगी पावत्या, मुदत ठेव पावत्या, जनरल सभांची प्रोसिडिंग बुक्स आदी सर्व दप्तर देवस्थानच्या धर्मशाळेच्या खोलीत कपाटबंद ठेवून सुरक्षित ठेवलेले आहे. धर्मादाय विभागाकडून दप्तर तपासणी झाल्यास कोणतीही त्रुटी राहू नये म्हणून सदरचे दप्तर क्रमवारीने लावून त्याचे एक रजिस्टर करण्यात आले आहे. देणगीदार तथा हितसंबंधी व्यक्तीलाही दप्तराची पडताळणी करता येईल अर्थात त्यासाठी देवस्थानला अल्प देणगी फी द्यावी लागेल. सन २००७/०८ ते सन २०१९/२० पर्यंतचे सर्व ऑडिट रिपोर्ट फेसबुक पेजला पोस्ट लिहून लिंक केले आहेत...

● **ऑडीट रिपोर्ट**... सन २०१९-२० चे आर्थिक वर्ष मार्च मध्ये संपल्यावर सर्व जमाखर्चाचे अकौंटींग व ऑडीटींग करून हा ऑडीट रिपोर्ट धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या वेबसाईटला दि. ३१.०७.२०२० रोजी अपलोड करण्यात आलेला आहे. हे काम करण्यासाठी लेखनिक श्री. दत्तात्रय श्रीकृष्ण रानडे, राजापूर यांचे सहकार्य महत्त्वाचे आहे.. तसेच सी. ए. श्री. निलेश नंदकुमार पाटणकर, राजापूर व त्यांच्या ऑफिसचा स्टाफ यांचेही योगदान मोलाचे आहे. तसेच धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या वेबसाईटवर ऑडिट रिपोर्ट अपलोड केल्याची पोच पावती घेऊन देवस्थान लेटर हेडसह पुनश्च ऑडिट रिपोर्ट मे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रत्नागिरी यांचे कार्यालयात दाखल करून त्याला मान्यता घेण्यात आलेली आहे.

● **लघुरुद्र स्वाहाकार**... उत्सवातील रविवार दि. १० नोव्हेंबर २०१९ रोजी प्रतिवर्षाप्रमाणे 'लघुरुद्र स्वाहाकार' हा धार्मिक विधी पार पाडण्यात आला. उपस्थित सर्व भाविक भक्तांना खिचडी प्रसाद म्हणून वाटण्यात आला.. सुमारे ३००/३५० भक्तांनी यज्ञाच्या पूर्णाहुतीच्या कार्यक्रमाला आपली उपस्थिती लावली होती.. या स्वाहाकाराला

श्री. विजयराव भुस्कुटे यांनी त्यामध्ये पुढारपण घेऊन अन्य ब्रह्मवृन्दांच्या मदतीने हा कार्यक्रम यथासांग पार पाडला आहे. या स्वाहाकाराला सौ. माधुरी मोहन व श्री. मोहन भास्कर परांजपे हे यजमान म्हणून लाभले होते. सन २०११ पासून सलगपणे कार्तिकोत्सवात लघुरुद्र स्वाहाकार यथाविधी पार पाडला जात आहे...

- **वार्षिक होळी उत्सव...** सोमवार दि. ०९.०३.२०२० रोजी बारागावची होळी श्री. विघ्नेश भरत गोखले (खोत), होळी यांचेकडे होती. यावेळी श्रीदेवी भरत दुर्गेच्या भक्त मंडळींनी उत्स्फूर्त स्वागत केले. श्रीदेवीला साडी चोळी, दक्षिणा ठेवण्यात आली. उत्साह, गावकरीमंडळींची लक्षणीय उपस्थिती व केलेले आदरातिथ्य विशेष स्मरणीय ठरले आहे. यावेळी सुमारे ७००/८०० खेळगडी उपस्थित होते. तर गावाची होळी श्री. विजय पुरुषोत्तम भुस्कुटे, मिठगवाणे यांचेकडे होती. त्यावेळी भुस्कुटे कुटुंबियांनी केलेले स्वागत व आदरातिथ्य ठळकपणे लक्षात राहील. सकाळी ठिक ५.०० वाजता एका होळीचा होम झाला. मंगळवार दि. १०.०३.२०२० रोजी संध्याकाळी देवीच्या मांडावर ठिक ७.०० वाजता गावगाऱ्हाणी झाली, श्रीदेवीच्या मंदिरात खिरापत वाटप झाले. वाजतगाजत निशाणे श्रीदेवाच्या मंदिरात आली.. होळीच्या या सर्व कार्यक्रमांना उपस्थिती लक्षणीय होती... या होळी कार्यक्रमाचे व्हिडीओ शूटिंग करून फेसबुकला व व्हॉट्सअॅपला पाठवलेले आहे...

- **लोखंडी गेट ...** मंदिराच्या तटबंदीला असणारे चारही बाजूच्या दरवाजांना लोखंडी गेट बसविण्यात आले आहेत. यामुळे मोकड कुत्र्यांचा वावर पूर्णपणे कमी झाला आहे.. तसेच रात्री हे सर्व गेट बंद करून घेतल्यामुळे मंदिराचे काही अंशी संरक्षण झाले आहे. कोरोनाकाळात मंदिरबंदी साठी या सर्व गेटचा उपयोग झाला आहे...

- **जनरल मिटिंग...** सोमवार दि. २८.१०.२०१९ रोजी कार्तिकोत्सवाची जनरल मिटिंग पार पडली. या मिटिंगला खोत, मानकरी, सेवेकरी उपस्थित होते. एकूण उपस्थिती ४९ होती. या मिटिंगमध्ये अहवालाचे वाचन व अहवाल वाटप, उत्सवाचे नियोजन, जमा खर्चाचा आढावा घेण्यात आला. तर सोमवार दि. १७ फेब्रुवारी २०२० रोजी महाशिवरात्री आणि होळी उत्सवाच्या नियोजनाची मिटिंग पार पडली. या मिटींगला एकूण ४३ ची उपस्थिती होती. उत्सवाच्या नियोजनामध्ये सर्वांचा समावेश असावा, सर्वांच्या सूचना, अनुभव, कल्पना लक्षात याव्यात म्हणून जनरल मिटिंगचे आयोजन करण्यात येते.. कामकाजात पारदर्शकता रहावी, सर्वांना जमा खर्चाची माहिती मिळावी, एकांगी कारभार न होता सर्वसमावेश कामकाज व्हावे, सर्वांचा सहभाग राहावा हा त्यामागील हेतू आहे... सन २००७/२००८ पासून नियमितपणे सर्व सेवेकरी, मानकरी, खोत मंडळी, विश्वस्त मंडळी यांना नोटीस बजावणी करून जनरल मिटिंला आमंत्रित करण्यात येते... अनेकांनी सुचवलेल्या सूचनेनुसार काही नवीन कार्यक्रम आखले जातात... सर्व मिटिंगच्या नोटीसा, प्रोसिडिंग यांचे नीटपणे जतन करण्यात आले आहे....

- **धर्मादाय निधीची प्राप्ती...** अर्बन बँक राजापूर यांचेकडून यावर्षीही राखीव धर्मादाय निधी रु. १०००० देवस्थानला प्राप्त झालेला आहे. देवस्थानकडून बँकेचे आभार मानण्यात आले आहेत. बँकेकडे श्री देव अंजनेश्वर चे डिपॉझीट ठेवल्यापासून प्रतिवर्षीच्या कर्तिकोत्सवाचे वेळी आठवणीने चॅरिटीफंड श्री देवाला दिला आहे...

- **श्रीदेवाची फुलबाग...** नित्य पूजेला विपुल फुले मिळवीत, त्यामध्ये विविधता असावी, परिसराची शोभा वाढावी या हेतूने श्रीदेवाच्या फुलबागेत वेगवेगळ्या जातीची फुलझाडे लावण्यात आली आहेत. तसेच सिमेंटशीटच्या कुंड्या करूनही फुलझाडे लावण्यात आली आहेत...

- **विहिरीचे काम पूर्णत्वास...** मंदिराच्या लगतच्या बाजूला खोदलेल्या विहिरीचे सर्व बांधकाम पूर्ण झाले आहे... सुमारे २५००/३००० जांभ्या दगडात ही विहीर बांधण्यात आली आहे... २५' व्यासाची गोल विहीर, त्याला साडेतीन फुटी कठडा, सभोवताली चारफुटाची दगडी फरस व त्याही बाहेर दोन फुटी दगडी कठडा... श्री. नरेश कांबळी, श्री. दिलीप वालकर, श्री. संतोष शिंदे, श्री. रामदास रायकर यांनी परिश्रमपूर्वक बांधकाम केले... श्री. संतोष

मसूरकर यांनी आरसीसी रिंग आदी काम केले... श्री. सय्यद हसोळकर यांनी विहिरीवरील षट्कोनी पत्राशेडचे काम केले... सर्व देखरेख श्री. दत्ताराम जगन्नाथ तथा बाळूशेठ पाटणकर यांची... सर्वांनी आवर्जून विहिरीचे बांधकाम बघून जावे, अशी विनंती आहे...

● **सुसज्ज निवास व्यवस्था...** भक्त निवासामध्ये लाकडी पार्टिशन करून सहा नवीन खोल्यांची निर्मिती करण्यात आली आहे. या खोल्यांचे रंगकाम करून घेण्यात आले. प्रत्येक खोलीला पंखा, कॉट, कपडे वाळत घालण्यासाठीच्या दोऱ्या, बेसीन, आदी सोयी करण्यात आलेल्या आहेत. एकूण ८/९ स्नानगृहे, ८/९ शौचालये, कमोडची सुविधा, युरीनल्स, गरम पाण्यासाठी स्टील बंबाची व्यवस्था, इलेक्ट्रिक गिझर, जनरेटरची सोय, सतरंज्या, बेडशीट, उश्या, भोजनासाठी डायनिंग टेबल, प्रत्येक खोलीत डस्टबिन, मुबलक पाणीपुरवठा आदी सोयींनी सज्ज अशी निवास व्यवस्था करण्यात आली आहे. अनेक भक्तांनी लेखी अभिप्राय नोंदवून समाधान व्यक्त केले आहे.. उत्सवकालावधीत दोन्ही वेळचे भोजन, चहापान, अल्पोपहार आदी नि:शुल्क पुरविण्यात येते .. ही सर्व व्यवस्था श्री. सदानंद तुकाराम लिंगायत व त्यांच्या पत्नी सौ. स्मिता सदानंद लिंगायत अत्यंत परिश्रमपूर्वक पार पाडतात.

● **उत्सवातील नामसंकीर्तन...** श्रीदेवाच्या कार्तिकोत्सवामध्ये ह. भ. प. श्री. श्रीधरबुवा खोंड यांची कीर्तने झाली. त्यासाठी ऑर्गन साथ श्री. उदय गोखले, नाणार व तबला साथ श्री. भालचंद्र बाळ, दापोली यांनी केली. पाच दिवस वेगवेगळ्या विषयांवर कीर्तन श्रवणाचा लाभ भाविकांना झाला. श्रीदेवाच्या महाशिवरात्री उत्सवाला डोंबिवली येथील प्रसिद्ध कीर्तनकार सौ. वेदश्री ओक यांची कीर्तने झाली. त्याकरिता प्रसिद्ध ऑर्गन वादक श्री. उदय गोखले, नाणार यांची साथ लाभली तर तबला साथ श्री. आनंदा ओळकर, कशेळी यांनी केली. दर्जेदार कीर्तनकारांना बोलवून कीर्तन परंपरा जपण्याचा प्रयत्न केलेला आहे. कीर्तनकारांची निवास भोजनाची सोय श्री. सदाशिव भार्गव ऊर्फ सदूभाऊ ताम्हनकर यांचेकडे... अगदी प्रेमाचे आदरातिथ्य... प्रत्येक कीर्तनकाराने कीर्तनात श्री. सदूभाऊंचा उल्लेख आवर्जून केलाच, परंतु पत्रव्यवहारांमध्ये सुद्धा त्यांना नमस्कार सांगता केला.. श्री देवाच्या उत्सवात 'ऑर्गन' सुध्दा श्रीमान सदूभाऊंचाच...

● **ऑर्गन सेवा...** ऑर्गनच्या रूपाने श्री. सदूभाऊ ताम्हनकरांची सेवा श्री चरणी वर्षानुवर्ष रुजू झालेली आहे... आपला ऑर्गन अंजनेश्वरच्या दरबारात वाजतो, याचे समाधान त्यांना मिळते... देवस्थानकडून ऑर्गन सेवेबद्दल केवळ श्रीफळ दिले जाते...

● **नित्य पूजा/धुपारती ठिक सात वाजता...** सकाळची नित्यपूजा व संध्याकाळची धुपारती अखंडित सुरु असल्या तरी त्याला ठराविक वेळेचे बंधन नव्हते. कुणी तसा प्रयत्नही केला नव्हता. सन २०१८ च्या मार्गशीर्ष महिन्यापासून सकाळची नित्यपूजा सकाळी ठिक ७.०० वाजता होत आहे तर संध्याकाळची धुपारती ठिक ७.०० वाजता होत आहे. दोन्हीवेळी ध्वनिक्षेपकावरून सनई लावली जाते. कोरोना काळातही यामध्ये कोणत्याही प्रकारचा खंड पडला नाही...

● **वार्षिक अहवाल... एक नवीन पायंडा...** देवस्थान मार्फत देणगीदारांना पंचवार्षिक अहवाल पाठवला गेला आहे. पंचवार्षिक अहवालाची पद्धत रद्द करून वार्षिक अहवाल देण्याचे बंधन देवस्थानने स्वीकारले आहे. वर्षाचा जमाखर्चाचा हिशोब सर्व देणगीदारांना कळवा, हा त्यामागील प्रामाणिक हेतू आहे. सन २०१८/१९ चा वार्षिक अहवाल सुमारे १२०० देणगीदारांना टपाल सेवेमार्फत पाठविण्यात आला आहे. तसेच हा अहवाल श्रीदेव अंजनेश्वरच्या फेसबुक अकाउंटला व व्हॉट्सअॅपला अपलोड करून सर्वांसाठी कायमस्वरूपी उपलब्ध करून ठेवण्यात आलेला आहे. यामुळे अहवालाबाबत प्रतिक्रिया नोंदविणे अनेकांना शक्य झाले आहे व देवस्थानचा कारभार अहवाल रूपाने प्रत्यक्ष देणगीदार नसलेल्या लोकांपर्यंत, परदेशस्थ भाविकांपर्यंत पोहोचला आहे. यामुळे गेल्या वर्षभरात देणगीचा ओघ वाढलेला दिसून येत आहे. अनेक देणगीदारानी प्रत्यक्ष भेटून, पत्रव्यवहार करून व फेसबुकच्या माध्यमातून या अहवालातील एकूण कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले आहे. आमच्या दृष्टीने हे 'सोशल ऑडीट' अत्यंत मोलाचे आहे.

- **पणत्यांची रोषणाई... दीपोत्सव...** कार्तिक उत्सवामध्ये सुमारे १२०० पणत्यांची आरास मंदिर परिसरात करण्यात आली होती. त्यासाठी लागणारे शेंगदाणा तेल अनेक भाविकांनी स्वयंस्फूर्तीने आणलेले होते. ३/४ दिवस मंदिरातील परिसर, त्रिपुर या पणत्यांच्या प्रकाशात उजळून दिसत होते. विजेच्या दिव्यांच्या लखलखत्या प्रकाशात पणत्यांचा प्रकाश आपले 'अस्तित्व' जाणीव करून देत होता. श्री. अभिजित कुळकर्णी याने यामध्ये विशेष पुढाकार घेतला होता...

- **श्रीदेव अंजनेश्वर फेसबुक अकाऊंट...** देणगीदार, पुणे-मुंबईसह बाहेरगावी रहाणारे चाकरमानी यांनी 'shridevanjaneshwar' या फेसबुक अकाऊंटला लिंक झाले पाहिजे, जेणेकरून देवस्थानसंबंधातील माहिती,घडामोडी, आदी माहिती आपल्याला मिळू शकेल.. कलशारोहणाच्या कार्यक्रमाचे फोटो, व्हिडीओ, अन्य कार्यक्रमाचे व्हिडीओ, देवस्थानचे अहवाल या ठिकाणी अपलोड करण्यात आलेले आहेत.. आपल्या सूचना, अभिप्राय या ठिकाणी आपण आम्हाला पाठवू शकता ....

- **पेस्ट कंट्रोल...** मंदिर व धर्मशाळेच्या इमारतीचे पेस्ट कंट्रोल यावर्षीही करण्यात आले. तसेच श्रीदेवी मुहूर्ताईच्या मंदिरामध्ये व भराडणीच्या मंदिरामध्ये पेस्ट कंट्रोल करण्यात आले. हे सर्व काम श्री. जगदीश चेऊलकर स्वत: गावी येतात तेव्हा विनामोबदला करीत असतात.

- **सूचना वही...** भाविक भक्तांच्या सूचना, तक्रारी किंवा अन्य बाबी आमच्यापर्यंत पोहोचाव्यात म्हणून मंदिरामध्ये सूचनावही ठेवण्यात आली आहे. कुणीही भाविक अथवा देवस्थान हितसंबंधी व्यक्ती त्यामध्ये आपल्या सूचना, तक्रारी, अभिप्राय लिहू शकतात. सुचविलेल्या सूचनांचा आदर केला जातो. अनेक भाविक भक्तांनी आपले फोन नंबर, सूचना, अभिप्राय या सूचनावहीत नोंदविले आहेत.

- **आरती सोमवारची...** दर सोमवारी संध्याकाळी ठीक ७.०० वाजता श्रीदेवाच्या मंदिरात आरती होतात. माडबन पासून अनेक भाविक त्यामध्ये उपस्थित असतात. सन १९९४ पासून सातत्याने हा उपक्रम सुरू आहे. सामान्यपणे या आरतीला ५०/५५ ची उपस्थिती असते. आरती अगदी वेळेवर चालू होतात व केवळ चार आरती म्हणून वेळेवर समाप्त होतात हे याचे महत्त्व आहे. कोरोनामुळे गेल्या मार्च महिन्यापासून ही सोमवारची आरती बंद आहे...

- **काकडाआरती...** रविवार दि. २७ ऑक्टोबर २०१९ रोजी नरक चतुर्दशीला सकाळी ५.३० वाजता काकडा आरती झाली. हा उपक्रमही सन १९९४ पासून अविरत चालू आहे. याला जवळपास १००/१२५ भाविक उपस्थित राहिले होते.. लाडू वाटप, चहापान करण्यात आले..

- **श्रावणातील नामजप...** शेवटच्या श्रावण सोमवारी दि. २६ ऑगस्ट २०१९ रोजी सायंकाळी ७.०० वा. नामजपाचा कार्यक्रम पार पाडण्यात आला. हा उपक्रम तर ३०/३५ वर्षापेक्षाही पूर्वीचा आहे. नामजपाचा कार्यक्रम अद्यापही सातत्याने सुरू आहे, खंडित झालेला नाही.. सर्व उपस्थित भाविकांना चहापान देण्यात आले होते... यावर्षी कोरोना संकटामुळे नामजपाचा कार्यक्रम होऊ शकला नाही..

- **चैत्रातील वसंतपूजा व दसऱ्याच्या दिवशीचे सोने लुटणे कार्यक्रम ...** चैत्रातील वसंतपूजा कार्यक्रम ब्राह्मण समाजापुरता मर्यादित असला तरी आज अनेक पिढ्या हा कार्यक्रम पार पाडत आहेत.. मात्र यावर्षी कोरोना संकटामुळे वसंत पूजेचा कार्यक्रम होऊ शकला नाही... दसऱ्याच्या दिवशीचा सोने लुटण्याचा कार्यक्रम अगदी उत्साहात पार पडतो. श्रीदेवाच्या सोन्याची पूजा (आपट्याची पूजा), त्यानंतर आरती, वाजन्त्र्यासह श्रीदेवी मुहूर्ताईच्या मंदिरात जाणे.. सुमारे १५०/२०० ग्रामस्थांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम निर्विघ्नपणे पार पडतो, हे विशेष आहे....

- **समाराधना....** त्रिपुरारी पौर्णिमेच्या दिवशी बलिपूजन झाल्यावर श्रीदेवाला नैवेद्य दाखविणे, तसेच श्रीदेवी मुहुर्ताईसह अन्य देवतांना नैवेद्य दाखविणे व त्यानंतर सुमारे २००-२५० सेवेकरी-मानकरीवर्गाला भोजन प्रसाद देणे इतकेच मर्यादित स्वरूप समाराधानेचे होते. सर्व भक्तांना भोजन प्रसाद मिळावा या हेतूने त्याचे स्वरूप हळू हळू बदलत गेले. भोजन प्रसादाचा संपूर्ण खर्च देणारे अनेक दाते पुढाकार घेऊ लागले. सामान्यपणे दुपारी १२.३० ते २.३० वाजेपर्यंत भोजनप्रसादाची वेळ आखून देण्यात आली. त्यामधील 'मी तू पण' प्रयत्नपूर्वक संपविण्यात आले. 'सहनाववतु सहनौभुनक्तु' ही वेदांची शिकवण कृतीत आणण्यात आली. समाराधानेचे स्वरूप दिवसेनदिवस वाढत आहे. जवळपास २२००/२३०० भाविक भक्तांनी भोजन प्रसादाचा यावर्षी लाभ घेतला. यावर्षी श्रीदेवाला प्रिय असणारा 'वडे-घाटल्याचा' मेनू असल्यामुळे भोजन प्रसादाची चव काही औरच झाली होती. अनेक भक्तमंडळी, सेवेकरी, लहानलहान मुले यामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतात. यामधील सर्व कामांची विभागणी केलेली असल्याने सर्व काही सुरळीत होते. या वाढलेल्या स्वरूपामुळे मंडप व्यवस्था, बैठक व्यवस्था, सर्व भांडी समान मुबलक प्रमाणात उपलब्ध झालेले आहे. वेळ व शिस्त याचे काटेकोर पालन करणारी 'समाराधना' प्रत्येक भक्ताने अनुभवली पाहिजे, असे विनम्रपणे सुचवावेसे वाटते.

- **रात्रौ ठिक ९.०० वाजता सुरु होणारा उत्सव...** रात्रौ ठीक ९.०० वाजता सुरू होणारा उत्सव सुरू होण्यात याही वर्षी खंड पडला नाही. सर्व सेवेकरी मानकरी यांच्या सहकार्यातून कार्तिकोत्सवाची व महाशिवरात्री उत्सवाची सुरुवात रात्रौ ठीक ९.०० वाजता धुपारतीने होते, हे आवर्जून सांगावेसे वाटते. यामुळे आरती, भोवती कार्यक्रम अगदी नियोजित वेळी पूर्ण होऊन कीर्तनाची सुरुवात ठरविलेल्या वेळी होते. तसेच कोणताही सांस्कृतिक कार्यक्रम असला तरी त्याच्या सादरी करणाला पुरेसा वेळ मिळतो. वेळेचे काटेकोर पालन झाल्यामुळे सर्वांनाच सेवा करण्याचा लाभ मिळतो. दररोजचे कार्यक्रम वेळीच संपत असल्यामुळे जागरणाचा त्रासही होत नाही. अर्थात हा बदल सहज झालेला नाही. त्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागली व त्यामध्ये प्रयत्नपूर्वक सातत्य ठेवावे लागले. ज्यांनी ज्यांनी हा उत्सव प्रत्यक्ष पाहिलेला नसेल त्यांनी अवश्य भेट देऊन हा नियोजनाचा उत्सव पहावा, असे आम्ही आग्रहाने सांगतो आहे.

- **श्री देवी मुहूर्ताई मंदिरासाठीची पाणी व्यवस्था...** पाण्याची टाकी उन्हात तडकून गेल्याने नवीन सिंटेक्स टाकी व पाईप फिटिंग करण्यात आले.. श्री. सुरेश रघुनाथ तथा बाळू मेस्त्री यांनी हे सर्व काम लक्षपूर्वक करून घेतले आहे... यामुळे भाविक भक्तांना हातपाय धुऊन दर्शनासाठी जाता येते.

- **रंगीत लॅमिनेटेड फोटो छपाई....** श्री. प्रशांत भडेकर यांनी मुंबईला जाऊन या फोटोंची छपाई करुन घेतली आहे... रु. १५० किमती मध्ये लॅमिनेटेड फोटो व साधा फोटो रु. ५० मध्ये उपलब्ध केलेले आहेत... शिवाजी नाक्यावरील मातोश्री जनरल स्टोअर्स मध्ये फोटो विक्रीसाठी उपलब्ध आहेत..

- **श्री. राजाभाऊ पटवर्धन यांची दप्तर पडताळणी...** श्री. राजाभाऊ पटवर्धन यांनी दि. २४.०६.२०२० रोजी येऊन श्री देव अंजनेश्वर वहिवाट जमीन स. नं. ६१/१ व स. नं. ५६/८ याबाबतचा एकूण जमीन व्यवहार सर्व दस्त ऐवज पडताळणी करून पाहिला आहे.. याबाबत फेसबुक पेजवर पोस्ट लिहून विस्तृत विवेचन केले आहे..

- **दोन झुंबर... मुकशाळेमध्ये...** मुकशाळेत दोन झुंबर बसवून मुकशाळेची शोभा वाढवण्यात आली आहे... अनेक दिवसांपासूनची अनेकांची इच्छा होती... ती पूर्ण झाली... मुकशाळेची शोभा वाढली...

- **महाशिवरात्रीला समारोपाला प्रसाद वाटप...** महाशिवरात्रीच्या उत्सवामध्ये शिरा प्रसादाचे वाटप करण्यात आले... सुमारे २५०/३०० डिश शिराप्रसाद वाटण्यात आला... अनेकांनी याबद्दल समाधान व्यक्त केले आहे... या प्रसादासाठी सुद्धा प्रायोजक मिळू लागले आहेत...

- **श्री मुहूर्ताईच्या दगडी फरशीचा मेंटेनन्स...** श्री. बबन गडगेकरने पुढाकार घेऊन श्री देवी मुहूर्ताईच्या मंदिराच्या बाहेरील फरशीमधील दरजा भरण्यात आल्या..

- **महाशिवरात्री उत्सवात ब्राह्मण व्यवस्था...** श्री. प्रकाश परांजपे यांनी तीनही दिवस उपस्थित राहून भाविक भक्तांच्या एकादशण्या, अभिषेक करण्यात आल्या आहेत.. अनेकांनी याबाबत समाधान व्यक्त केले आहे...

- **मंडपाला संपूर्ण शेडनेट...** नवीन मंडपांना शेडनेट घेऊन त्याला शिलाई मारून व प्लास्टिक दोरीची बॉर्डर शिवून आणि सोबत झालर शिवून छत तयार करणेत आले.. श्री. भगवान पावसकरांनी आपले शिलाई कौशल्य वापरून ते छत शिलाईचे काम केले आहे..

- **देणगीदार रजिस्टरचे संगणकीकरण...** देवस्थानच्या देणगीदारांच्या पत्त्यात बदल होतात. झालेले बदल देणगीदारांकडून कळविले जात नाहीत. परिणामी पाठविलेली निमंत्रणे पोहोचत नाहीत. गेल्या १० वर्षातील देणगी पावत्यांचा मागोवा घेऊन नव्याने पत्ता रजिस्टर तयार करण्याचे काम अत्यंत मेहनतीने केलेले आहे. संगणकीय रजिस्टर यादी करण्याचे काम चालू आहे. तरी देणगीदारांनी आपले बदललेले पत्ते पत्रव्यवहार करून देवस्थानला कळवावेत. संपर्क क्र. ९८२३२७७३२६ ह्या WhatsApp नंबर वर मेसेज करून आपले बदलेले पत्ते कळवता येतील..

- **सर्व खर्च धनादेशाद्वारे...** देवस्थानचा सर्व खर्च धनादेशाद्वारे करण्यात आलेला आहे.शक्यतो क्रॉस चेकने सर्व अदाई केलेली आहे... काही किरकोळ खर्चाचे अपवाद वगळता कोणताही खर्च रोख रक्कमेने केला जात नाही.

- **देवस्थानची आर्थिक स्थिती...** देवस्थानचा रु. १ कोटी ६५ लाखाचा निधी राजापूर अर्बन बँक, जानशी पठार शाखा यामध्ये मासिक प्राप्ती ठेव योजनेमध्ये ठेवून त्याचे मासिक व्याज श्रीदेवाच्या बचत खात्याला मिळविले जात आहे. रु. ५१ हजारांच्या दोन मुदतठेवींना मुदतवाढ देण्यात आली नसल्याने सदरच्या मुदतठेवी बचतखात्यात जमा झाल्या आहेत. कै. गौरी हरी देसाई यांचे स्मरणार्थ रु. २५०००.०० ची मुदत ठेव श्री. नारायण हरी देसाई यांनी ठेवून त्याचे संपूर्ण व्याज श्रीदेवाच्या बचत खात्यात ट्रान्स्फर केलेले आहे. कै. गोपाळ विष्णू देवधर यांचे स्मरणार्थ रु. २००००.०० ची मुदत ठेव श्री. प्रदीप गोपाळ देवधर यांनी ठेवून त्याचे संपूर्ण व्याज श्रीदेवाच्या बचत खात्यात ट्रान्स्फर केलेले आहे. श्री. अतुल सदाशिव भोगले यांनी रु. १००००.०० ची मुदत ठेव ठेवून त्याचे संपूर्ण व्याज श्रीदेवाच्या बचत खात्यात ट्रान्स्फर केलेले आहे. श्री. ओंकार महेश नेने यांच्या मुदत ठेवीतील व्याज श्रीदेवाचे बचत खात्याला ट्रान्स्फर झालेले आहे. श्री. यशवंत वासुदेव बावकर, मिठगवाणे-बावकरवाडी यांच्या रु. १०००० च्या मुदतठेवीचे व्याज श्रीदेवाच्या बचत खात्याला जमा होत आहे. कै. गो. बा. देसाई यांच्या ठिकाणामधील सागवान विक्रीतून मिळालेली रक्कम रु. दोन लाख श्री. नंदकुमार मधुसूदन परांजपे यांनी मुदत ठेवीमध्ये गुंतवून त्याचे मिळणारे संपूर्ण व्याज श्रीदेवाच्या बचत खात्यात ट्रान्स्फर केले आहे. तर देवस्थानच्या बचत खात्यात रु. चार लाखाच्या वर रक्कम जमा आहे. देवस्थानची आर्थिक स्थिती अतिशय भक्कम झाली आहे.

(सन एप्रिल २०१९ ते मार्च २०२० व त्यानंतरच्या कालावधीत झालेल्या कामांचा / घडामोडींचा आढावा ढोबळपणे घेतलेला आहे.)

# श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे
## सन २०१९ – २०२० चा जमाखर्च

**जमा**

| | | |
|---|---|---|
| | | आरंभीची शिल्लक |
| रु. | २५,१४९.०० | हाती रोख |
| रु. | ३९,१०८.७४ | बँक ऑफ इंडिया खाते |
| रु. | २,१६,६७०.०० | देणगी |
| रु. | १,९१,३४२.०० | उत्सव देणगी |
| रु. | १८,१०१.०० | उत्सव जमा |
| रु. | १४,४५८.०० | बँक व्याज |
| रु. | १४,६९,३५८.०० | स्थिर निधी व्याज |
| रु. | ४,०००.०० | भक्त निवास भाडे |
| रु. | ७,४३२.०० | वस्तू विक्री जमा |
| रु. | १४,५११.०० | खुर्च्या भाडे |
| रु. | २०,९००.०० | इतर जमा |
| रु. | ११,७८०.०० | प्रसाद साहित्य देणगी |
| रु. | ११,०००.०० | सजावट देणगी |
| रु. | २,५२,६५९.०० | सुवर्णकलश निधी |
| रु. | ११,५७५.०० | वस्तुरूप देणगी |
| रु. | १,२९०.०० | भांडी सामान देणगी |
| रु. | १५,०९८.०० | अलंकार पूजा साहित्य देणगी |
| रु. | १,०२,०००.०० | स्थिर निधी जमा |
| रु. | ८०,०००.०० | व्यक्तिगत उसनवार |
| रु. | १,००,०००.०० | चुकीची नोंद खाते जमा |
| रु. | २६,०६,४३१.७४ | एकूण |

**खर्च**

| | | |
|---|---|---|
| रु. | ५,७६,०२६.०० | उत्सव खर्च |
| रु. | ३८,२५०.०० | छपाई खर्च |
| रु. | २५,९३०.०० | मंदिर सजावट खर्च |
| रु. | २,६३२.०० | बँक कमिशन |
| रु. | २५,९६४.०० | मंदिर रंगकाम खर्च |
| रु. | ५,००१.०० | बक्षिसे खर्च |
| रु. | ७,०००.०० | टपाल खर्च |
| रु. | ८,५८०.०० | वाहतुक खर्च |
| रु. | १,५७५.०० | पूजा खर्च |
| रु. | २,४२,०४२.०० | देखभाल दुरुस्ती खर्च |
| रु. | ९,४५०.०० | बगिचा खर्च |
| रु. | १०,७७५.०० | विद्युत खर्च |
| रु. | ७००.०० | इनव्हर्टर देखभाल खर्च |
| रु. | ८४०.०० | स्टेशनरी |
| रु. | ११,३००.०० | गेट खर्च |
| रु. | १,२०,०००.०० | नित्यसेवा मानधन |
| रु. | ११,०००.०० | पुजारी मानधन |
| रु. | ९,२२०.०० | विद्युत बिले |
| रु. | १०,०००.०० | इतर खर्च |
| रु. | २,५९,८५३.०० | विहीर खर्च |
| रु. | ११,१११.०० | मुख्यमंत्री सहाय्यता निधी |
| रु. | १०,०००.०० | लेखनिक मानधन |
| रु. | १७,०१०.०० | सफाई खर्च |
| रु. | ३,४३,२५०.०० | इनकम टॅक्स |
| रु. | १०,९४०.०० | कायम सामान |
| रु. | २५,०००.०० | इनव्हर्टर बॅटरी |
| रु. | ३६,७०८.०० | सोलर सिस्टीम खर्च |
| रु. | ९,५०४.०० | सी. सी. टी. व्ही.सिस्टिम |
| रु. | १५,०९८.०० | अलंकार व पूजा साहित्य |
| रु. | २,४२,१५०.०० | लोखंडी मंडप |
| रु. | ८०,०००.०० | व्यक्तिगत उसनवार परत |
| रु. | १,००,०००.०० | चुकीची नोंद खाते खर्च |
| | | अखेर शिल्लक |
| रु. | ११,०७२.०० | हाती रोख |
| रु. | ३,१८,४५०.७४ | बँक ऑफ इंडिया खाते |
| रु. | २६,०६,४३१.७४ | एकूण |

**विश्वस्त,**
श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे
ता. राजापूर, जि. रत्नागिरी.

# उत्सव देणगीदार यादी सन २०१९-२०

(रु.५००/-च्या वरील देणगीदारांची नावे या यादीत समाविष्ट आहेत.)

| पा. नं. | नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| १५४ | श्रीकृष्ण गंगाधर देसाई | १२०१०/- |
| १६१ | मेघ:शाम यशवंत नेने | २००२/- |
| १६३ | अविनाश श्रीधर आपटे | १०००/- |
| १६४ | सौ. निलीमा शरद महाबळ | ५००/- |
| १६६ | रामचंद्र निळकंठ भोगले | २१००/- |
| १६८ | जयदीप ढमढेरे | १००१/- |
| १६९ | सौ. उज्वल जयदीप ढमढेरे | ५०१/- |
| १७३ | जयंत गोविंद वैद्य | २५०००/- |
| १७६ | धनश्री नितीन भोगले | ५००१/- |
| १८५ | नीळकंठ वामन देसाई | १०५०/- |
| १९१ | सौरभ भुस्कुटे | ५०१/- |
| १९६ | मिलिंद ढमढेरे | १००१/- |
| १९९ | अशोक पर्शरामपंत गोखले | १०००/- |
| २०० | सुरेश पर्शरामपंत गोखले | १०००/- |
| २५१ | राजेश शंकर फडके | ५००१/- |
| २५५ | संजय पंडित पावसकर | ५०१/- |
| २५६ | नित्यानंद जयंत भोगले | ५०००/- |
| २५७ | रविंद्र शंकर कुळकर्णी | ५००/- |
| २५९ | शिवराम के. जैतापकर | ५०१/- |
| २६० | श्रीधर दत्ताराम गवाणकर | ५००/- |
| २६१ | सुरेश शंकर हिंदळेकर | ५००/- |
| २६३ | वसंत चिंतामणी गोखले | ५००/- |
| २६४ | हरिश्चंद्र महादेव आडिवरेकर | २१००/- |
| २६८ | श्याम बलवंत गोगटे | ५०१/- |
| २६९ | आनंदा भिकाजी गोरे | १०००/- |
| २७० | प्रदीप गोपाळ देवधर | १००१/- |
| २७१ | प्रमोद प्रकाश हिंदळेकर | १००१/- |
| २७४ | प्रशांत वैद्य | ५०१/- |
| २७६ | राजेंद्र वासुदेव नेवरेकर | ५००/- |
| २७९ | दिवाकर गोविंद भोगले | १०००/- |
| २८१ | नितीन सदाशिव धुरी | ५५१/- |
| २८२ | अमित विनायक काळे | १०००/- |
| २८६ | प्रभाकर रघुनाथ मांजरेकर | ५००/- |
| २८७ | शरद मुकुंदराव देसाई | ५००/- |
| २८८ | चैतन्य देसाई | ५००/- |
| २८९ | अशोक विनायक काळे | १००१/- |
| २९० | राहुल प्रकाश पावसकर | ५२५/- |
| २९१ | प्रकाश धोंडू पावसकर | ५५१/- |
| २९३ | महादेव गोपाळ चव्हाण | ५११/- |
| २९४ | उदय अनंत देसाई | १०००/- |
| २९५ | शामसुंदर पाटणकर | ५००/- |
| २९६ | मिहीर नेवरेकर | ५००/- |
| ३०० | अनिल केरोजी वाघधरे | २१००/- |
| ४०७ | रामचंद्र यज्ञेश्वर फडके | १००१/- |
| ४०८ | अमोल रामचंद्र फडके | ५०१/- |
| ४०९ | निर्मला प्रभाकर गांगल | ५०१/- |
| ४१९ | वसंत भास्कर मोहीते | ५११/- |
| ४२० | निखिल दिलीप कुवेसकर | २००२/- |
| ४२१ | राजन विष्णू मेस्त्री | ५०१/- |
| ४२२ | सुरेश गंगाराम आयरे | ५००/- |
| ४३५ | यश विश्राम तांबे | ५०१/- |
| ४३६ | अर्णवी प्रशांत मोहीते | १००१/- |
| ४३७ | विहान समीर मोहीते | ७०१/- |
| ४४१ | जगदीश मोहन चेऊलकर | ५०१/- |
| ४४२ | सौ. पूजा जगदीश चेऊलकर | ५०१/- |
| ४४५ | सुधाकर कृष्णा लिंगायत | ५००/- |
| ४४६ | प्रभाकर बापू कांबळी | ५०१/- |
| ४५७ | आर्यस सतीश कांबळी | ५०१/- |
| ४६० | पंकज लक्ष्मण देसाई | १०००/- |
| ४६१ | रोहीत संतोष पाटणकर | ५०१/- |
| ४६३ | सुरेश केशव लिंगायत | ५०१/- |
| ४६४ | विकास विनायक लिंगायत | ५५१/- |
| ४६६ | मंजुश्री अमरेश लोकरे | ५०१/- |
| ४७८ | जोशी बंधू, तिवरांबी | ११११/- |
| ४८१ | सिताराम अप्पा दांडेकर | ५०१/- |
| ४८३ | सुधीर लहू लिंगायत | ५०१/- |

| पा. नं. | नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ४९६ | पांडुरंग भिकाजी तांबे | ५०१/- |
| ४९९ | ओम, प्रार्थना, प्राची, शरण्या, भार्गवी चेऊलकर | ५०१/- |
| ५०१ | सत्यवान महादेव मयेकर | ५०१/- |
| ५०३ | विठ्ठल दत्तात्रय वैद्य | ५५०/- |
| ५०४ | सुरेश दत्तात्रय वैद्य | ५५०/- |
| ५०५ | सुजाता विष्णू वैद्य | ५५०/- |
| ५०६ | दहेश अनंत वैद्य | ५५०/- |
| ५०७ | अमित विजयानंद भुस्कुटे | ५०००/- |
| ५०८ | दिनकर महादेव भुस्कुटे | १०००/- |
| ५२३ | विकास तुकाराम जोशी | ५०१/- |
| ५२५ | रमेश भगवान चव्हाण | ५००/- |
| ५२६ | रविंद्र अनंत भुस्कुटे | ११११/- |
| ५३४ | लक्ष्मण कृष्णाजी भुस्कुटे | १०००/- |
| ५३६ | पूनम महादेव उन्हाळेकर | ५०००/- |
| ५३७ | पूनम महादेव उन्हाळेकर | ५०००/- |
| ५४३ | देवदत्त गुरुदास मांजरेकर | १००१/- |
| ५४४ | नुपूर चंद्रकांत मयेकर | १०००/- |
| ५४६ | रविंद्र बापू गावकर | १००१/- |
| ५४८ | विकास यशवंत काजवे | ५११/- |
| ५५३ | विनायक बापू चव्हाण | ५०१/- |
| ५५४ | विश्वनाथ बाळकृष्ण काजवे | ५०१/- |
| ५६९ | सुर्यकांत यशवंत पाटील | ५०१/- |
| ५७३ | गणपत लक्ष्मण बावकर | १०००/- |
| ५७४ | प्रसाद यशवंत बावकर | ५००/- |
| ५८५ | निलेश श्रीधर चेऊलकर | १००१/- |
| ५९३ | निखिल संतोष राऊत | ६०१/- |
| ६०४ | नेहा, प्राची, अर्चना, अरुण मांजरेकर | ५००/- |
| ६१२ | प्रसाद गोविंद गवाणकर | ५००/- |
| ६१४ | अनिला भिकाजी सुर्वे | १००१/- |
| ६१५ | नारायण केशव बावकर | ५११/- |
| ६१७ | श्रीकृष्ण काशिनाथ शिरधनकर | ५०१/- |
| ६२० | रोहन राजकुमार गवाणकर | ५०१/- |
| ६२१ | अनंत विठ्ठल भोगले | १००१/- |
| ६२२ | उदय विष्णू भोगले | १००१/- |
| ६२४ | बाळाराम धोंडू कांबळी | ५००/- |

| पा. नं. | नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ६३० | सुनयना सुधीर जावकर | ५०१/- |
| ६३५ | राज सत्यवान घोगळे | ५०१/- |
| ६३७ | अनिकेत नरेश शिंदे | ५०१/- |
| ६५२ | भुस्कुटे परिवार, गोवा (महाप्रसाद) | १००००/- |
| ६५३ | भुस्कुटे परिवार, गोवा | १७०२/- |
| ६६४ | रज्जाक यासिर खान गवाणकर | ५००/- |
| ६६९ | रंजना मोहन वैद्य | ५००/- |
| ६७३ | किर्ती, सौरभ, विनोद बोटले | १००१/- |
| ६८० | ज्ञानेश्वर दत्ताराम गवाणकर | ५०१/- |
| ६८७ | श्रुती विश्वनाथ गवाणकर | ५०१/- |
| ६८८ | हिमांशू प्रकाश भोमकर | ५०१/- |
| ६८९ | सौरभ सुरेश हडकर | ५०१/- |
| ६९० | कल्पना शरद गवाणकर | ५०१/- |
| ६९१ | अनिल पांडुरंग गवाणकर | ५०१/- |
| ६९५ | संतोष आबा मोहीते | १०००/- |
| ६९६ | प्रवीण महादेव मोहीते | ५०१/- |
| ६९७ | विद्याधर नरहरी मोहीते | ५०१/- |
| ७१८ | सतीश अनंत अमरे | ५०१/- |
| ७२२ | निहार राजाराम मदने | ५५१/- |
| ७२४ | प्रिया योगेश पालकर | ५११/- |
| ७२५ | पंकज प्रकाश मणचेकर | ५११/- |
| ७२७ | कमला दत्तात्रय चेऊलकर | ५०००/- |
| ७३८ | नितीन मेळेकर | ५०१/- |
| ७४१ | संतोष सुरेश कांबळी | १००१/- |
| ७५५ | विक्रांत विकास गडकर | ५०१/- |
| ७५७ | ज्ञानेश मधुकर मोहीते | ५०१/- |
| ७७४ | चंद्रकांत देवरुखकर | ५११/- |
| ७७८ | सुधीर दामोदर राऊत | ५०१/- |
| ७९८ | वसंत आत्माराम राऊत | ११११/- |
| ७९९ | रुपेश वसंत पाटणकर | ५०१/- |
| ८०० | सौ. पद्मावती माधव मिर्लेकर | ५००/- |
| ८०४ | अशोक आनंदा गिरकर | ५०१/- |
| ८०९ | विनोद राऊत | ५०१/- |
| ८१० | कमलाकर गुणाजी मुटाटकर | ५०१/- |
| ८४५ | सुरेखा कृष्णकुमार पोचळे | ५०१/- |
| ८४७ | आरती अरुण बागवे | ५०१/- |

| पा. नं. | नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ८५० | यशवंत निलकंठ लिंगायत | ३००१/- |
| ८५४ | हेमलता रमाकांत पाटणकर | ५०१/- |
| ८६१ | श्रीकांत चित्तरंजन लिंगायत | ५०१/- |
| ८६२ | लक्ष्मी शांताराम लिंगायत | ५०१/- |
| ८६३ | श्रेया योगेश पाटकर | ५०१/- |
| ८६४ | शांताराम सदाशिव जळगावकर | ५०१/- |
| ८६७ | लवू लक्ष्मण केळुसकर | ५०१/- |
| ८७५ | ओम अमोल ढमढेरे | ११११/- |
| ८७६ | अश्विनी अरुण जुवेकर | ५०१/- |
| ८८० | दत्तात्रय बंडू शेवाळे | ५०१/- |
| ८८९ | सदानंद गंगाराम तेली | १००१/- |
| ८९० | अशोक मनोहर तेली | ५०१/- |
| ८९२ | पद्माकर गंगाराम पाटणकर | ५०१/- |
| ८९८ | गणेश दत्तात्रय चेऊलकर | ५०१/- |
| ९०६ | वेदा विजय कदम | १००१/- |
| ९१५ | अनिल महादेव | ११११/- |
| ९१६ | मधुकर मोतिराम कुवळेकर | ५०२/- |
| ९१८ | मनोहर सीताराम सोमण | ५००/- |
| ९२८ | ईश्वरी मधुकर पावसकर | ५००/- |
| ९३६ | दत्तात्रय गोविंद देसाई | १००१/- |
| ९३७ | विठ्ठल गोविंद देसाई, सुशीला विठ्ठल देसाई, गणेश गोविंद देसाई | ५००१/- |
| ९४३ | डि. ए. ठाकरे | ५०१/- |
| ९६७ | संजय सत्यविजय मयेकर | ५०१/- |
| ९६८ | ओमकार अंकुश सरंबळकर | १००१/- |
| ९८८ | अशोक खेडेकर | ५०१/- |
| १००५ | कामिनी कमलाकर शिंदे | ५००/- |
| १०१३ | नितीन माधवराव खरे | ५००/- |
| १०२२ | प्रणित श्रीधर सुर्वे | ५५५/- |
| १०२३ | शैलेंद्र तुकाराम सुर्वे | ५०१/- |
| १०२४ | रमेश जयराम शिर्सेकर | ११११/- |
| १०२५ | कै. राधाबाई गोपाळ शिर्सेकर | ५०५/- |
| १०२६ | अवनिश सुधाकर शिर्सेकर | ५०५/- |
| १०२८ | ओमकार विलास चव्हाण | ५०१/- |
| १०३१ | उदय बाळकृष्ण दांडेकर | ५००/- |
| १०३३ | विजय पुरुषोत्तम भुस्कुटे | ५०१/- |

| पा. नं. | नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| १०३५ | प्रकाश गंगाराम कांबळी | ७५१/- |
| १०४६ | अमित दिवाकर पाटणकर | ५०१/- |
| १०४८ | जनार्दन मेस्त्री | ५००/- |
| १०४९ | अरविंद चेऊलकर | १००१/- |
| ११२२ | विजय सखाराम गवाणकर | ५००/- |
| ११२३ | शामसुंदर यशवंत म्हंकाळ | ५०१/- |
| ११२५ | नंददीपक काशिनाथ कातारे | ५०१/- |
| ११५३ | विलास लक्ष्मण हळदणकर | ५००/- |
| ११६९ | प्रशांत कैलास कांबळी | ५०१/- |
| ११९० | शिवणेकर सर | ५००/- |
| ११९१ | प्रताप दिवाकर चेऊलकर | ५००/- |
| ११९४ | दिलीप बाळकृष्ण उन्हाळेकर | ५०१/- |
| ११९६ | किशोर कल्याण गिरकर | २२२२/- |
| ११९७ | प्रकाश विश्वनाथ काजवे | ५५५/- |
| ११९९ | विलास चंद्रकांत मांजलकर | ५०१/- |
| १२०९ | मंदार संदेश कांबळी | ११११/- |
| १०५२ | विद्या विलास चेऊलकर | ५०१/- |
| १०६० | तेजस प्रदीप कुळकर्णी | ५०१/- |
| १०६१ | अरुण बाळकृष्ण गुरव | १००१/- |
| १०६२ | प्रसाद केळकर | ५००/- |
| १०६५ | मुकुंद यशवंत वैद्य | २०००/- |
| १०६८ | नंदकुमार गणेश चितळे | ५५१/- |
| ३५१ | अक्षय सुनिल भस्कुटे | ५००/- |
| ३५२ | विवेक वासुदेव जोगळेकर | ५००/- |
| ३५४ | विलास जनार्दन बर्वे | ५०१/- |
| ३५५ | प्रकाश भास्कर खाडीलकर | ५२१/- |
| ३५६ | मयुरेश चंद्रकांत सोमण | ५००/- |
| ३५९ | अक्षय दुर्गेश मांजरेकर | ५०५/- |
| ३६० | प्रसाद भिकाजी सुर्वे | ५११/- |
| ३६४ | विशाल अरुण मोहीते | २००१/- |
| ३६५ | गजानन राजाराम भुस्कुटे | ५००/- |
| ३६८ | राजन बाळकृष्ण कुवेसकर | १००१/- |
| ३७१ | कविता नायर(चप्पल स्टँडसाठी देणगी) | ६०००/- |
| ३७२ | समिधा शशिकांत सोहनी | १०००/- |
| ३७९ | ॲड. धनंजय दिनकर देसाई | १५००/- |

| पा. नं. | नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ३८० | बँक जमा | ५००/- |
| ३८२ | अरविंद ढमढेरे | ३००००/- |
| ३०१ | धनलक्ष्मी शिवराम चेऊलकर | २१००/- |
| ३०२ | साहील समीर गवाणकर | १००१/- |
| ३०३ | सलोनी समीर गवाणकर | ५०१/- |
| ३०४ | संतोष बाळकृष्ण गवाणकर | ५०१/- |
| ३०५ | योगेश प्रभाकर आंजर्लेकर | ५००/- |
| ३०९ | पियुष देसाई | १००१/- |
| ३१० | सुनिल यशवंत मोहीते | ५०१/- |
| ३११ | अनिल जे. जैतापकर | ११११/- |
| ३१२ | शंकर आर. पेंडसे | ५००/- |
| ३१३ | विजय वसंत परांजपे | ५००/- |
| ३१५ | बँक जमा | ५००/- |
| ३१६ | वसंत महादेव गोरे | १०००/- |
| ३१७ | श्रीदेवी मुहूर्ताई मंदिर हस्ते सुधाकर लिंगायत | २०००/- |
| ३१९ | विनायक पांडुरंग कुवेसकर | १००१/- |
| ३२० | उल्हास अंकुश मांजरेकर | ५००/- |
| ३२२ | चेअरमन, राजापूर अर्बन को-ऑप. बँक लि. राजापूर | १००००/- |
| ३२३ | रविंद्र पांडुरंग बांधकर | ५०२/- |
| ३२८ | सुनिल गोपाळ देवधर | ५०००/- |
| ३२९ | योगेश मंगेश कुळकर्णी | ५००/- |
| ३३० | उदय विजय परांजपे | ५००/- |
| ३३१ | गीता सोमकांत कांबळी | ५००/- |
| ३३२ | दयाघन संभाजी शिंदे | १०००/- |
| ३३४ | मधुकर मेहेंदळे | ५०१/- |
| ३३८ | सुधीर बाळकृष्ण कुवेसकर | ३०००/- |
| ३४० | अमेय महेश कुळकर्णी | ५०००/- |
| ३४२ | गजानन त्रिंबक देसाई | ५००/- |
| ३४३ | अनिल महेश भुस्कुटे | २१००/- |
| ३४४ | सतीश वसंत कुळकर्णी | १०००/- |
| ३४५ | श्रीधर दत्ताराम गवाणकर | ५००/- |
| ३४६ | व्यंकटेश शिरीष पेंडुरकर | ५००/- |
| ३४७ | आदित्य जयप्रकाश बागाऊकर | ५०१/- |
| ३५० | रंजन दत्तात्रय वैद्य | ६००/- |

| पा. नं. | नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| २०३ | अभिजित अ. भुस्कुटे | ५००/- |
| २०७ | विश्वास पांडुरंग ढमढेरे | १००१/- |
| २०९ | दीपक र. भोगले | ५०१/- |
| २१६ | रोहीत रुपेश भोगले | ५००/- |
| २२४ | डॉ. प्रताप भालचंद्र पारकर | ५००/- |
| २२७ | वितेश यादव | ५०१/- |
| २३० | समीर अमरे | ५०१/- |
| २३१ | कौस्तुभ बापट | १००१/- |
| २३२ | विद्याधर मेढेकर | ५०१/- |
| २३३ | मिलिंद वसंत राजापकर | ५०१/- |
| २३४ | प्रकाश वाघधरे | ५०१/- |
| २३५ | सुरेखा यशवंत वाघधरे | ५०१/- |
| २३७ | तुकाराम सखाराम पावसकर | ५०१/- |
| २४७ | संदीप देऊ राणे | ६००/- |

## सुवर्ण कळस निधी

| | | |
|---|---|---|
| १५१ | विनायक पांडुरंग कुवेसकर | ११११/- |
| १५२ | प्रकाश रघुनाथ परब | ५००/- |
| १५५ | धनंजय दिनकर देसाई | ५००१/- |
| १५६ | दिनकर वासुदेव देसाई | ५००१/- |
| १५७ | अंजली गजानन दीक्षित | १०००/- |
| १५८ | कै. त्रिंबक केशव देसाई स्मरणार्थ श्री. गजानन देसाई व भगिनी | १००००/- |
| १६२ | योगेश प्रकाश नार्वेकर | १००१/- |
| १७० | नंदा श्याम चेऊलकर | १००१/- |
| १७१ | गिरीष हरिश्चंद्र दांडेकर | ५१६/- |
| १७२ | रमेश रामचंद्र खानविलकर | २२५/- |
| १७७ | शोभा राजाराम भागवत | १००१/- |
| १८० | शांताराम बापू भातडे | २०००/- |
| १८३ | सौ. भाग्यश्री अजित अंगडी | २१००/- |
| १८७ | प्रशांत वैद्य | १००१/- |
| १९० | आनंद यशवंत पाटणकर | ३००००/- |
| १९५ | आनंद यशवंत पाटणकर | २१०००/- |
| ४१० | प्रभाकर शंकर कुवेसकर | २५०००/- |

| पा. नं. | नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ४११ | कै. विद्याधर आंबेरकर स्मरणार्थ पंढरिनाथ आंबेरकर | २५०००/- |
| ४१२ | नंदकुमार गंगाराम मिरगुले | २५०००/- |
| ४७६ | सिद्धेश शिवाजी पावसकर | १०००/- |
| ५३५ | सुनिल रावण पोवार | २०००/- |
| ५४२ | संगीता संदीप मांजरेकर | ५००/- |
| ५५२ | देविदास भिकाजी कुडाळकर | १००१/- |
| ५५९ | प्रिया उमेश गवस | २००१/- |
| ५६० | आरती अशोक परब | ५०१/- |
| ५६६ | अनंत गोविंद पांचाळ | १००१/- |
| ६४८ | सहदेव बाबू नेवरेकर | ६००१/- |
| ७०२ | सागर श्रीकांत राऊत | ५५५/- |
| ७०३ | सुप्रिया सुधीर काजवे | १०१/- |
| ७०४ | सिद्धेश सुधीर काजवे | १०१/- |
| ७२८ | नितीन कल्याण मेस्त्री | ५००/- |
| ७५४ | वामन नारायण मोहीते | ५१००/- |
| ८२८ | सान्वी तुषार काजवे | १०००/- |
| ८३६ | माधुरी मारुती मांजरेकर | १०७१/- |
| ८५३ | कै. रमाकांत पाटणकर स्मरणार्थ हेमलता रमाकांत पाटणकर | ११०१/- |
| ८७१ | कै. गणपत न. सुतार यांचे स्मरणार्थ श्रीमती तारामती सुतार, ॲड्. शशिकांत सुतार, बलवंत सुतार यांजकडून | २६०००/- |
| ९६५ | सरिता रघुनाथ धनावडे | २०००/- |
| १०२१ | सुधीर बा. कुवेसकर | ५०००/- |
| ११०९ | सुनिल लक्ष्मण हळदणकर | २०००/- |
| ११११ | रामचंद्र पांडुरंग ठुकरुल | ५०१/- |
| ११६८ | प्रशांत कैलास कांबळी | १००१/- |
| ११७६ | मधुकर दत्तात्रय जोगले | ५००/- |
| ११७७ | मिनल मधुकर जोगले | ५००/- |
| ११७८ | कै. लक्ष्मीबाई कुवेसकर स्मरणार्थ मिनल मधुकर जोगले | ५००/- |
| ११८८ | दिगंबर जयंत गोखले | १०१/- |
| ११८९ | विशाल रामदास दांडेकर | १०१/- |
| १०५१ | कै. गोविंद गणपत गवाणकर स्मरणार्थ श्री. प्रसाद गोविंद गवाणकर | २५१०१/- |
| ३७३ | कै. रघुनाथ धोंडू मेस्त्री स्मरणार्थ त्यांचे नातू यांजकडून | ८१११/- |
| ४९२ | विजय गो. मोहीते | २५१/- |
| | एकूण | २,५२,६५९/- |

## भांडी सामान देणगी

| पा. नं. | नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| १५९ | निर्मला वैद्य (स्टील पिंप १) | १२९०/- |
| | एकूण | १२९०/- |

## उत्सव साहित्य सजावट देणगी

| पा. नं. | नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ३८४ | बागेतील सुतार मंडळी, मिठगवाणे उत्सवात मंदिर सजावटीसाठी झेंडू, गुलाब फुले | ११०००/- |
| | एकूण | ११०००/- |

## वस्तुरूप देणगी

| पा. नं. | नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| १८२ | विलास चेऊलकर कळसावरील स्टील दांडी, त्रिशूळ, ध्वज | ४०००/- |
| ७२६ | निलेश चेऊलकर, २० ब्लँकेट | ४०००/- |
| ११२१ | शामकांत लिंगायत दागिन्यांसाठी स्टीलची पेटी | १३७५/- |
| ३३९ | रुक्मिणी कोंडेकर, मंदिरासाठी झुंबर | २२००/- |
| | एकूण | ११५७५/- |

## प्रसाद साहित्य देणगी

| पा. नं. | नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| २५८ | जयंत जोशी (खडीसाखर) | ४८०/- |
| ३२६ | राजोपाध्ये (तांदूळ १५० किलो) | ९०००/- |
| ३२७ | राजा लिंगायत (तेल डबा व तांदूळ) | २०००/- |
| ३४९ | जयंत जोशी (खडीसाखर) | ३००/- |
| | एकूण | ११७८०/- |

## अलंकार, पूजा सामान देणगी

| पा. नं. | नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ३६७ | शीतल तुंबार्डेकर(चांदीची गुलाबदाणी) | ८३०० /- |
| ३३७ | सुधीर कुवेसकर(सोन्याची नथ) | ६७९८/- |
| | एकूण | १५०९८/- |

**दिवंगत व्यक्तींबद्दल सहवेदना ...**

'वासांसि जीर्णानि यथा विहाय। नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।।'... असे जरी असले तरी दिवंगतांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे.. श्रीदेवाच्या सेवेकरी कुटुंबामधील श्री. अनिल पांडुरंग गवाणकर यांचे दुःखद निधन झाले... श्रीदेवाचा 'एक सेवेकरी' व 'मोठा देणगीदार' आमच्यातून कायमचा निघून गेला आहे.. श्री.गणपतशेठ बावकर यांची पत्नी सौ.सुलोचना गणपत बावकर यांचे निधन दि. ०२.०९.२०२० रोजी झाले आहे.. श्री. स्नेहलता नारायण कुळकर्णी यांचेही निधन झाले आहे.. मूळचे मिठगवाणे गावचे व राजापूरचे माजी नगराध्यक्ष श्री. आनंद यशवंत तथा बंडुशेठ पाटणकर यांचेही अल्प आजाराने निधन झाले आहे.. परमेश्वर सर्व मृतांचे आत्म्यांना शांती देवो, सद्गती देवो, हीच प्रार्थना...

- **आभार**... देवस्थान कामकाजामध्ये भाग घेणाऱ्या सर्व सेवेकरी, मानकरी, खोत मंडळींचे... आभार देवस्थानला सढळ हस्ते देणगी देणाऱ्या देणगीदारांचे... आभार देवस्थानच्या वार्षिक कामकाजात, बांधकामात भाग घेणारे... सर्वश्री श्री. दत्ताराम जगन्नाथ ऊर्फ बाळू पाटणकर, श्री. नरेश कांबळी, श्री. रमेश काजवे, श्री. विलास मेस्त्री, श्री. नंदकुमार मेस्त्री, श्री. बापू मेस्त्री, श्री. बाळू मेस्त्री, श्री. सुनील काजवे, श्री. सय्यद हसोळकर, श्री. गिरिश धनावडे, श्रीम. विमल धनावडे, श्री. संजय मेस्त्री यांचा उल्लेख करावाच लागेल... वर्षभरात रंग साहित्य आदी पुरवणारे श्री. वैभव कुवेसकर, श्री. शिवाजी जैतापकर, श्री. सचिन मेस्त्री, श्री. राजन कुवेसकर, श्री. रमेशशेठ लांजेकर, नाटे यांचे आभार मानलेच पाहिजेत.... उत्सवात ध्वनी प्रकाश व्यवस्था करणारे श्री. सुयोग मालगुंडकर, श्री. गिरिश धनावडे, सविता इव्हेंट मॅनेजमेंट श्री. श्रीनिवास तारकर, श्री. अभि कुळकर्णी यांचे सुद्धा आभार.... श्री. दिपक नाटेकर व त्यांचे सर्व साथीदार यांचे आभार 'भोजन प्रसादासाठी'.... निरपेक्ष भावनेने आरतीला पेटीच्या साथीची सेवा बजावणारे श्री. भागवत राऊत यांचे आभार.... राजापूर अर्बन बँकेचे आभार... तसेच बँक ऑफ इंडिया मिठगवाणे शाखेचे आभार... सर्व किराणा सामान पुरवणारे श्री. महेश पटवर्धन व श्री. मन्सूरखान गवाणकर यांचे आभार... विद्युत पुरवठा करणाऱ्या वीज मंडळाचे आभार.... भक्त निवास व्यवस्था पहाणारे सौ. स्मिता सदानंद यांचे आभार.... श्री. संतोष लिंगायत, श्री. विजय लिंगायत या बंधूंचे आभार मानलेच पाहिजेत.... श्री. सुधाकर लिंगायतचे तर विशेष आभार मानले पाहिजेत... श्री देवी मूहूर्ताईच्या उत्सवामध्ये त्यांची साथ नसती तर उत्सव पार पडणे कठीण झाले असते... पत्नीवियोगाचे दुःख बाजूला सारून त्यांनी केलेली सेवा सदैव स्मरणात ठेवली पाहिजे... सीए श्री. निलेश पाटणकर व त्यांच्या ऑफिसमधील सर्व स्टाफ, श्री. दत्ताभाऊ रानडे ही सर्व मंडळी आभार मानण्यास पात्र आहेत.. अनेक लहान लहान मुले छोट्या छोट्या हातांनी नकळतपणे अनेक कामे करत असतात... ती मुलं लहान असली तरीही आभार मानण्यास पात्र आहेत... सहज स्वभाव म्हणून 'निंदा करणारे' सुद्धा यात सहभागी असतात... त्यांचेही मी मनस्वी आभार मानतो... कारण त्यांच्या निंदेमुळे काम 'गतिमान' होते, 'बिनचूक' होते.... निंदकांच्या प्रकाशात काम झाले की आपल्या चुका, उणीवा कमी होतात, म्हणून त्यांचे आभार सुद्धा मानत आहे व त्यांना 'दंडवत' सुद्धा घालत आहे....



कार्तिकोत्सवातील कीर्तनसेवा...
ह.भ.प. श्री. श्रीधरबुवा खोंड, नागपूर



कार्तिकोत्सवातील लघुरुद्र स्वाहाकारातील यजमान पूजन...



कार्तिकोत्सवातील पणत्यांची रोषणाई...



स्वाहाकाराची पूर्णाहुती करताना
श्री. मोहन परांजपे सपत्निक व ब्रह्मवृंद...



दहावी शालांत परीक्षेत गुणवंतांचा सत्कार करताना
कु. मुक्ताई देसाई..



श्री देवाच्या मंदिराशेजारी बांधलेली नवीन गोलाकार विहीर...
जलसंजीवनी...

बँक ऑफ इंडिया

नातं बँकिंग पलीकडचं...

शाखाधिकारी श्री.विजय सखाराम गवाणकर,
बँक ऑफ इंडिया, मिठगवाणे शाखा
यांचेकडून कार्तिकोत्सवाला हार्दिक शुभेच्छा...

**बुक पोस्ट**

प्रति,
श्री./ श्रीम. ______________________

______________________

______________________

If undelivered
please return to-

प्रेषक : विश्वस्त, श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे
मु. पो. मिठगवाणे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी-४१६७०२
९८२३२७७३२६/ ७०३८७८५००१ / ९२८४३८८७३१